म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. नं. ८९१.
स्न १९८३

...ग' परिक्षेकरितां मंजूर झालेलें पुस्तक.

# काव्य-मकरंद

प्रो० वासुदेव गोविंद मायदेव, एम्. ए.

REFBK-0002361
REFBK-0002361

किंमत १० आणे.

विजय प्रेस, पुणें.

सन १९२४-२५ चे 'स्कूल लीव्हिंग' परीक्षेकरितां मंजूर झालेलें पुस्तक

# काव्य-मकरंद

( कविचरित्रें, काव्यचर्चा व टीपा यांसह )

प्रो॰ वासुदेव गोविंद मायदेव, एम्. ए.
अध्यापक, नाथीबाई ठाकरसी महिलापाठशाला,
यांनीं तयार केलें.

REFBK-0002361
REFBK-0002361

१९२३

सोल एजन्टस्
विश्वनाथ गणेश आणि कंपनी,
बुधवार पेठ, पुणें शहर.

किंमत १० आणे.

प्रकाशक
वासुदेव गोविंद मायदेव
हिंगणें-पुणें.

[सर्व हक्क स्वाधीन]

मुद्रक
अनंत सखाराम गोखले,
'विजय' प्रेस, ५७० शनवार, पुणें.

मराठी ग्रंथ संग्रहालय
क्र. नं. काव्य. ४१८
ता.

# प्रस्तावना.

ह्या लहानशा पुस्तकांत मराठी भाषेंतील जुन्या व नव्या कवितेचा थोडासा संग्रह केला आहे. त्यांत प्राचीन व अर्वाचीन, भाषासरणींतील आणि भावनांतील फरक आपोआप ध्यानांत यावा अशी योजना आहे. ह्याशिवाय प्रमुख रसांचा परिपोष करणारीं आख्यानें अगर त्रुटित कविता निवडून, विद्यार्थ्यांचें ज्ञान, रसिकता व आनंद ह्या त्रयीचा परिपोष साधण्याकडे मुद्दाम लक्ष पोंचविलें आहे. ह्या अल्प प्रयत्नानें मराठी कवितेचें स्वरूप ठोकळ मानानें होतकरू विद्यार्थ्यांचे ध्यानीं आल्यास माझ्या श्रमांचें चीज झालें असें मला वाटेल.

हिंगणें बुद्रुक
२०।१२।२३.

वा. गो. मायदेव.

# अनुक्रमणिका.


| कवि | | | | पृष्ठ |
|---|---|---|---|---|
| १ | ज्ञानेश्वर | .... | .... | १ |
| २ | तुकाराम | .... | .... | ५ |
| ३ | रामदास | .... | .... | १० |
| ४ | वामन | .... | .... | १४ |
| ५ | मुक्तेश्वर | .... | .... | १९ |
| ६ | मोरोपंत | .... | .... | २४ |
| ७ | होनाजी बाळ | .... | .... | ३२ |
| ८ | गणेश जनार्दन आगाशे | .... | .... | ३५ |
| ९ | नारायण वामन टिळक | .... | .... | ३८ |
| १० | कृष्णाजी केशव दामले | .... | .... | ४२ |
| ११ | विनायक जनार्दन करंदीकर | .... | .... | ४५ |
| १२ | गोविंदाग्रज | .... | .... | ५० |
| १३ | ठोंबरे | .... | .... | ५३ |

क्र. 2369
काव्य नं. ५१८

# काव्य-मकरंद

## ज्ञानदेव.

[ १२७५-१२९६ ]

[ ज्ञानदेव यांच्या वडिलांचें नांव विठ्ठलपंत व आईचें नांव रुक्मिणीबाई. विठ्ठलपंतांनीं संन्यासदीक्षा घेतल्यावर गुरूंच्या आज्ञेवरून पुन्हां गृहस्थाश्रम स्वीकारला. पुढें त्यांस चार अपत्यें झालीं. त्यांचीं नांवें निवृत्ति, ज्ञानदेव, सोपान आणि मुक्ताबाई अशीं ठेविलीं. हीं सर्व बाळपणापासून भगवद्भक्त व विरक्त अशीं होतीं. ज्ञानदेवांनीं आपल्या वडिल बंधूंजवळच गुरूपदेश घेतला व त्यांच्या प्रेरणेवरून अमृतानुभव आणि ज्ञानेश्वरी हे सर्वोत्तम ग्रंथ लिहिले. ज्ञानदेवांची भाषा जुनी तर खरीच, परंतु पुष्कळ वेळां तिच्या दुर्बोधतेबद्दल उगाच बाऊ केला जातो. एकवेळ अमृतानुभवाची भाषा कळण्यास कठिण आहे असें म्हटलें तर शोभेल; परंतु ज्ञानेश्वरी ही गीतेवरील टीका असल्यामुळें, आपणां हिंदु मराठी बोलणाऱ्यांस अल्प प्रयासानें कळण्याजोगी आहे. ज्ञानदेवांइतका रसाळ कविता लिहिणारा मराठी कवींत कोणीच झाला नाहीं असें म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं. उपमा व दृष्टांत ह्या अलंकारांवर ज्ञानदेवांचा फार भर. ह्यांची ओंवी तीन यमकांची व साडेतीन चरणी, आंखूड अशी असते. दिलेल्या पहिल्या उताऱ्यांत कौरवपांडवांच्या सैन्यांत शंख वाजवितांच काय गोंधळ उडाला याचें रसाळ वर्णन आहे, तो गजर किती भयंकर वाटला हेंहि समुचित व समर्पक शब्द योजून चित्रित केलें आहे.

त्यांतच श्रीकृष्णरथाचें मनोहर वर्णन आलें आहे. दुसऱ्या उताऱ्यांत भगवंत भावाचा भुकेलेला असतो हें तत्त्व, भक्ताच्या अत्यल्प वस्तुदानानें आपण किती संतुष्ट होतों हें कृष्णाकडून वदवून उत्तम वठविलें आहे. भक्तीचा ओलावा ज्ञानेश्वरींत फार, ह्यामुळें हा भाग ज्ञानदेवांना फार बहारीचा साधला आहे. ज्ञानदेवांनीं आळंदी येथें १२९६ त समाधी घेतली.]

## ज्ञानेश्वरी.

अध्याय १ ला—श्लोक १२-१६.

या राजयाचिया बोला। सेनापति संतोषला
मग तेणें केला। सिंहनाद ॥ १

तो गाजत असे अद्‌भुत। दोन्ही सैन्यांआंत
प्रतिध्वनि न समात। उपजत असे ॥ २

तयाचि तुलगासवें। वीरवृत्तीचेनि थावें
दिव्य शंख भीष्मदेवें। आस्फुरिला ॥ ३

ते दोन्ही नाद मीनले। तेथ त्रैलोक्य बधिरीभूत जाहलें
जैसें आकाश कां पडिलें। तुटोनियां ॥ ४

घडघडीत अंबर। उचंबळत सागर
शोभलें चराचर। कांपत असे ॥ ५

तेणें महाघोष गजरें। दुमदुमिताति गिरिकंदरें
तंव दळामाजी रणतुरें। आस्फुरिलीं ॥ ६

ऐसा अद्‌भुत तूरबंबाळ। ऐकोनि ब्रह्मा व्याकुळ
देव म्हणती प्रळयकाळ। वोढवला आजी ॥ ७

ऐसी स्वर्गीं मात। देखोनि तो आकांत
तंव पांडव दळा आंत। वर्तलें कायी ॥ ८

हो कां निजसार विजयाचें। कीं तें भांडार महातेजाचें
जेथ गरुडाचिये जावळिचे। कांतले चाऱ्ही ॥ ९

कीं पाखांचा मेरु जैसा । रहंवर मिरवतसे तैसा
तेजें कोंदाटलिया दिशा । जयाचेनि ॥ १०

जेथ अश्ववाहक आपण । वैकुंठींचा राणा जाण
तया रथाचे गुण । काय वर्णूं ॥ ११

ध्वजस्तंभावरी वानर । तो मूर्तिमंत शंकर
सारथी शार्ङ्गधर । अर्जुनेसीं ॥ १२

पाईक पाठीसीं घातला । आपण पुढां राहिला
तेणें पांचजन्य आस्फुरिला । अवलीळाचि ॥ १३

तैसाचि देखें येरें । निनादें अति गजरें
देवदत्त धनुर्धरें । आस्फुरिला ॥ १४

ते दोन्ही शब्द अचाट । मिनले एकवट
तेथ ब्रह्मकटाह शतकूट । हों पाहत असे ॥ १५

अध्याय ९ वा—श्लोक २६.

मग निःसीमभावउल्हासें । मज अर्पावयाचेनि मिसें
फळ एक आवडे तैसें । भलतयाचें हो ॥ १

भक्त माझियाकडे दावी । मग देंठ न फेडितां सेवीं
आणि मी दोन्ही हात वोढवीं । आदरेंसी ॥ २

पैं गा भक्तीचेनि नावें । फूल एक मज द्यावें
तें लेखें तरि म्यां तुरंबावें । परि मुखींची घालीं ॥ ३

हें असो कायसीं फुलें । पानचि एक आवडतें जाहलें
तें साजुकही न हो सुकलें । भलतैसें ४

परि सर्वभावें भरलें देखें । आणि भुकेला अमृतें तोखे
तैसें पत्रचि परि तेणें सुखें । आरोगूं लागें ॥ ५

अथवा ऐसेंही एक घडे। जे पालाही परि न जोडे
तरी उदकाचें तंव सांकडें। नव्हेल कीं॥ ६
तें भलतेथ निमोलें। न जोडितां आहे जोडलें
तेंचि सर्वस्व करूनि अर्पिलें। जेणें मज॥ ७
तेणें वैकुंठापासोनी विशाळें। मजलागीं केलीं राउळें
कौस्तुभाहूनि निर्मळें। लेणीं दिधलीं॥ ८
दुग्धाचीं सेजारें। क्षीराब्धीऐसीं मनोहरें
मजलागीं अपारें। सृजिलीं तेणें॥ ९
गरुडासारखीं वाहनें। मज सुरतरूचीं उद्यानें
कामधेनूंचीं गोधनें। अर्पिलीं तेणें॥ १०
मज अमृताहूनि सुरसें। बोनीं बोगरिलीं बहुवसें
ऐसा भक्तांचेनि उदकलेसें। परितोषें गा॥ ११
हें सांगावें काय किरीटी। तुवांचि देखिलें आपुलिया दिठी
मी सुदामयाचिया सोडीं गांठी। पव्हयांसाठीं॥ १२
पैं भक्ति एकी मी जाणें। तेथ सानें थोर न म्हणें
आम्ही भावाचे पाहुणे। भलतेया॥ १३
येर पत्र पुष्प फळ। हें भजावया मिष केवळ
वांचूनि आमुचिया लागीं निष्कळ। भक्तितत्त्व॥ १४
म्हणोनि अर्जुना अवधारीं। तूं बुद्धि एकी सोपारी करीं
तरी सहजें आपुलीया मनोमंदिरीं। न विसंबें मातें॥ १५

++++++

काव्य ८१८

# तुकाराम.

[ १६०८–१६४९ ]

[हे एक थोर भगवद्भक्त देहू मुक्कामीं होऊन गेले. यांच्या वडिलांचें नांव बोल्होबा व आईचें नांव कनकाई. हीं दोघेंही श्रीविठ्ठलाची उपासक होतीं. तुकारामबुवांचें पहिलें लग्न बाराव्या वर्षीं झालें. पहिली बायको दमेकरीण म्हणून पुण्याचे अप्पाजी गुळवे यांची कन्या जिजाबाई हिच्याशीं त्यांचें दुसरें लग्न झालें. तुकारामबुवांचे वडिल बंधु सावाजी हे तीर्थाटणास निश्चयानें निघणार असल्यामुळें संसाराचा सर्व भार तुकारामबुवांवर पडला. तुकारामबुवा सतरा वर्षांचे झाले नाहींत तों त्यांचे आईबाप निवर्तले. बंधु म्हटल्याप्रमाणें तीर्थाटनास निघून गेले. संसारांत तुकारामबुवांचा जीव लागेना. धंद्यांत गोड वाटेना. सावकाराचें देणें झालें. जिजाबाई महासंतापी असल्यामुळें तिच्या स्वभावालाही ते कंटाळून गेले. त्यांतून लवकरच एक दुष्काळ पडला, त्यांत पहिली बायको निवर्तली. अशा परिस्थितींत संसाराचा त्यांस पुरा वीट आला व ते सन्मार्गोन्मुख झाले. विठोबाची भक्ति त्यांनीं आरंभिली. अंगांत हळुहळू वैराग्य बाणलें व अशा रीतीनें ते थोर संतांच्या पदवीप्रत पोंचले.

तुकारामबुवांची रचना अभंगांत आहे. तुकारामबुवा जसे महान् साधु तसेच खरे उपदेशक व सत्कवि आहेत. त्यांची वाणी निःस्पृहबाण्याची व मनांत ठसण्याजोगी असून, त्यांची कविता प्रचारांतील सोप्या भाषेंत, सरळ, औत्सुक्यपूरीत, भक्तिरसानें थबथबलेली व प्रेमानें तल्लीन झालेल्या अंतःकरणापासून आपोआप बाहेर पडली आहे. तिच्या अंगीं नवनीतापेक्षां मार्दव व माधुर्य अधिक असून भेदकता विद्युत्प्राय आहे. पहिले कृष्णाच्या बाळक्रीडेचे अभंग वात्सल्यानें ओथंबलेले तर विष्णुदासांचा महिमा गातांना ते भेदक, जहाल व खड्गाप्रमाणें तीक्ष्ण धारेचे वाटतात. ही थोर विभूति १६४९ त वैकुंठवासी झाली.]

## बालक्रीडेचे अभंग.

१

लीलाविग्रही तो लेववी खाववी। यशोदा बैसवी मांडीवरी
मांडीवरी भार पुष्पांचिये परी। बैसोनियां करी स्तनपान
नभाचाही साक्षी पाताळापरता। कुर्वाळिते माता हातें त्यासी
हातें कुर्वाळोनी मुखीं घाली ग्रास। पुरे म्हणे तीस पोट धालें
पोट धालें मग देतसे ढेंकर। भक्तीचें तें फार तुळसीदळ
तुळसीदळ भावें सहित देवा पाणी। फार तें त्याहुनी क्षीरसागरा
क्षीराचा कंटाळा असे एकवेळ। भक्तीचें तें जळ गोड देवा
देवा भक्त जीवाहुनी आवडती। सकळही प्रीती त्यांच्या ठायीं
त्यांचा हा अंकित सर्वभावें हरी। तुका म्हणे करी सर्व काज

२

जयेवेळीं चोरूनियां नेलीं वत्सें। तयालागीं तैसें होणें लागे
लागे दोहों ठायीं करावें पाळण। जगाचा जीवन मायबाप
माय जाल्यावरी अवघ्या वत्सांची। घरीं वत्सें जीचीं तैसा झाला
जाला तैसा जैसे घरींचे गोपाळ। आणिक सकळ मोहरी पांवे
मोहरी पांवे सिंगे वाहिल्या काहाळा। देखिला सोहळा ब्रह्मादिकीं
ब्रह्मादिकां सुख स्वप्नींही नाहीं। तैसे दोहीं ठायीं वोसंडलें
वोसंडल्या क्षीर अमुप त्या गायी। जैसी ज्याची आई तैसा जाला
लाघव कळलें ब्रह्मयासी साचें। परब्रह्म साचें अवतरलें
तरले हे जन सकळही आतां। ऐसे तो विधाता बोलियेला
लागलाहे स्तुती करूं अनंताची। चतुर्मुख वाची भक्तिस्तोत्रें
भक्तिकाजें देवें केला अवतार। पृथिवीचा भार फेडावया
पृथिवी दाटिली होती या आसुरीं। न सहावे वरी भार तिये
तया काकुलती आपुल्या दासांची। तयालागीं वेंची सर्वस्वही

स्वहित दासांचें करावयालागीं । अव्यक्त हें जगीं व्यक्ती आलें
लेखा कोण करी त्यांचिया पुण्याचा । जयासवें वाचा बोले हरी
हरी नाममात्रें पातकांच्या राशी । तो आला घराशीं गौळियांच्या
गौळियें अवघीं झालीं कृष्णमय । नामें लोकत्रय तरतील
तरतील नामें कृष्णाचिया दोषी । बहुत ज्यांपाशीं होइल पाप
पाप ऐसें नाहीं कृष्णनामें राहे । धन्य तोचि पाहे कृष्णमुख
मुख माझें काय, मी वर्णुं पामर । मग नमस्कार घाली ब्रह्मा
ब्रह्मा नमस्कार घाली गोधनाशीं । कळला तयासी हाच देव
देवची अवघा झालासे सकळ । गाई हा गोपाळ वत्सें तेथें
तेथें पाहाणें जें आणीक दूसरें । मूर्ख त्या अंतरें दुजा नाहीं
भाव तुका म्हणे जयाचिया चित्तीं । रौरव भोगिती कुंभपाक

३

आजि ओस अमरावती । काला पहावया येती
देव विसरती । देहभाव आपुला
आनंद न समाये मेदिनी । चारा विसरल्या पाणी
तटस्थ त्या ध्यानीं । गाई जाल्या श्वापदें
जें या देवांचें दैवत । उभें आहे या रंगांत
गोपाळांसहित । क्रीडा करी कान्होबा
तया सुखाची शिराणी । तींच पाउलें मेदिनी
तुका म्हणे मुनी । धुंडितां न लभती

४

देखिलासी माती खातां । दांवियानें बांधी माता
जाळी घेउनि कांबळी काठी । गाई वळी, वेणू पाठीं
मोठें भावार्थाचें बळ । देव झाला त्याचें बाळ
तुका म्हणे भक्तीसाठीं । देव धांवे पाठोपाठीं

## विष्णुदास.

१

वैष्णव तो जया । अवघी देवावरी माया
नाहीं आणीक प्रमाण । तन धन तृण जन
पडतां जड भारी । नेमा न टळे निर्धारीं
तुका म्हणे याती । हो कां तयाची भलती

२

मुक्तिपांग नाहीं विष्णुचीया दासा । संसार तो कैसा न देखती
बैसला गोविंद उडोनिया चित्तीं । आदीं तेंचि अंतीं अवसानीं
भोग नारायणा देउनी निराळी । ओंवीया मंगळीं तोची गाती
बळबुद्धि त्यांची उपकारासाठीं । अमृत तें पोटीं सांठविलें
दयावंत तरी देवाचसारिखी । अपुली पारखी नोळखती
तुका म्हणे त्याचा जीव तोचि देव । वैकुंठ तो ठाव वसती ते.

३

झुंझार ते एक विष्णुदास जगीं । पापपुण्य अंगीं नातळे त्यां
गोविंद आसनीं गोविंद शयनीं । गोविंद त्यां मनीं बैसलासे
ऊर्ध्व पुंड्र भाळीं कंठीं शोभे माळ । कांपिजे कळीकाळ तया भेणें
तुका म्हणे शंखचक्रांचे शृंगार । नामामृतसार मुखामाजी.

४

चिंता नाहीं गांवीं विष्णुदासांचिये । घोष जयजयकार सदा
नारायणा घरीं सांठविलें धन । अवघेची वाण तयां पोटीं
सवंग सकळा पुरे धणीवरी । सेवावया नारीनरबाळा
तुका म्हणे येणें आनंदीआनंदू । गोविंदें गोविंदू पिकविला

५

मऊ मेणाहूनि आम्ही विष्णुदास। कठिण वज्रास भेदूं ऐसे
मेले जीत असों निजोनियां जागे। जो जो जें जें मागे तें तें देऊं
भले तरी देऊं कांसेची लंगोटी। नाठाळाचे काठी देऊं माथां
मायबापाहूनी बहु मायावंत। करूं घातपात शत्रूहूनि
अमृत तें काय गोड आम्हांपुढें। विष तें बापुडें कडू किती
तुका म्हणे आम्ही अवघेंचि गोड। ज्याचें पुरें कोड त्याचे परी

६

आम्ही वैकुंठवासी। आलों याचि कारणासी
बोलिले जे ऋषि। आलों साचभावें वर्ताया
झाडूं संतांचे मारग। आडरानीं भरलें जग
उच्छिष्टाचा भाग। शेष उरलें तें सेवूं
अर्थें लोपलीं पुराणें। नाश केला शब्दज्ञानें
विषयलोभीं मनें साधनें। बुडविलीं
पिटूं भक्तीचा डांगोरा। कळिकाळासी दरारा
तुका म्हणे करा। जयजयकार आनंदें.

++++++

काव्य ८१८

# रामदास.

[ १६०८-१६८२ ]

[ रामदास यांच्या पित्याचें नांव सूर्याजीपंत व मातेचें नांव राणूबाई; उपनांव ठोसर. यांचा जन्म गोदातीरीं जांब मुक्कामीं झाला. मौंजीबंधनाच्या वेळीं सावधान शब्दाबरोबर सावध होऊन ते घराबाहेर पडले व पंचवटीजवळ त्यांनीं श्रीरामचंद्राची कडकडीत उपासना केली. बरीच तीर्थयात्रा साधली. ह्यांसच पुढें रामदास, दास, समर्थ असेंही म्हणूं लागले. ह्यांचा सुप्रसिद्ध ग्रंथ म्हणजे दासबोध. हा ग्रंथ व्यवहारचातुर्याचा निधिच आहे. ह्यांचे मनाचे श्लोक, रामायणाचीं कांहीं कांडें, अभंग व स्तोत्रें हीं प्रसिद्ध आहेत.

पहिल्या उताऱ्यांत व्यवहारांत वागावें कसें यासंबंधीं थोडक्या शब्दांत उपदेश केलेला आढळेल, तर दुसऱ्यांत त्यांची चमत्कृतियुक्त व प्रासानुमिश्रित रचना कशी गंमतीची व गोड असते हें कळेल. महाराष्ट्रांत शिवाजीच्या काळीं स्वातंत्र्य व स्वधर्म ह्यांकडे राष्ट्र उन्मुख करण्याचे बाबींत ह्यांच्या सडेतोड कवितेचे, शुद्ध वर्तनाचे व उदंड उद्योगाचे प्रयत्न बरेच कारणीभूत झाले यांत संशय नाहीं.]

## चातुर्यलक्षण.

दासबोध—१९-२.

हेतु समजोन उत्तर देणें। दुसऱ्याचे जीवींचें समजणें
मुख्य चातुर्याचीं लक्षणें। तीं हीं ऐसीं ॥ १

बहुत बोलणें ऐकावें। तेथें मौन्यचि धरावें
अल्पचिन्हेंचि समजावें। जगदंतर ॥ २

बाष्कळांमध्यें बैसों नये। उद्धटासी तंडों नये
आपणाकरितां खंडों नये। समाधान जनांचें ॥ ३

नेणपण सोडूं नये। जाणपणें फुगों नये
नाना जनांचे हृदये। मृदुशब्दें उकलावे ॥ ४

शोध घेतां आळसों नये। भ्रष्ट लोकीं बैसों नये
बैसलें तरी टाकों नये। मिथ्या दोष ॥ ५

अंतर आर्ताचें शोधावें। प्रसंगीं थोडेंचि वाचावें
चटक लावूनि सोडावें। भल्या मनुष्यासी ॥ ६

मजालसींत बैसों नये। समाराधनेसी जाऊं नये
जातां केंविलवाणें होय। जिणें आपुलें ॥ ७

उत्तम गुण प्रकटवावे। मग भल्याशीं बोलतां फावे
भले पाहोन करावे। शोधून मित्र ॥ ८

जगापाशीं जगमित्र। जिव्हेपाशीं असे सूत्र
कोठें तरी सत्पात्र। शोधून काढावे ॥ ९

सकळांमध्यें थोर श्रवण। श्रवणाहून थोर मनन
मननें होय समाधान। बहुत जनांचें ॥ १०

धूर्तपणें सकळ जाणावें। अंतरीं अंतर बाणावें
समजल्यावीण शिणावें। कासयासी ॥ ११

## यमुनातटाक.

नदीतिरें मनोहरें। जळें सुनीळ सुंदरें
डोहो कितेक मातले। अनंत जीव रातले ॥ १

नदी खळाळिती बळें। जळें बहूत चंचळें
फुगे चळण वांकणें। निरें विराजती गुणें ॥ २

घबाबिती घबाबिती । ध्वनी अनेक वाजती
बहुत रंग रंगसे । कितेक ते तरंगसे ॥ ३

अनेक मच्छ कच्छपें । कितेक सुंदरें रुपें
बहू जळीं चळाळिती । क्रिडाभरें उफाळिती ॥ ४

कदंब लंब लंबले । नदीतटाक बिंबले
लता लता बहू लता । तरूसमूह पूरता ॥ ५

अनेक वृक्ष दाटले । निबीड दाट थाटले
बनें बनें बहू बनें । अचाट दाटलीं घनें ॥ ६

फळें फुलें परोपरी । कितेक वोघ भीतरीं
विशाळ तीं सरोवरें । विशेष तुंबलीं भरें ॥ ७

अनेक तुंब तुंबले । नदीतटाक बिंबले
सुरंग रंग पद्मिनी । कितेक त्या कुमोदिनी ॥ ८

बहुत बोलती खगें । चमक दाविती मृगें
कुसुमवाटिकाभरें । त्रिगुंतलीं मधूकरें ॥ ९

तुषारसा पळे पळु । सुगंध वात सीतळू
कितेक वृक्ष डोलती । अनेक जीव बोलती ॥ १०

कितेक शूक सारिका । मयोर बुल्बुलादिका
चकोर चक्रवाक ते । बदक थीर कीर ते ॥ ११

रसाळ उत्तमा किळा । ध्वनी कळोळ कोकिळा
थिरावली मनोगती । मधूर उंच कुजती ॥ १२

ध्वनी बनीं विराजल्या । बहु प्रकार माजल्या
जनावरें मनोहरें । सुखें सुखावलीं भरें ॥ १३

कपी कपी बहु कपी । उलाट धीट साक्षपी
लता अनेक औघडा । बळेंच घालिती झडा ॥ १४

कडाडिती खडाडिती । बहू तरू झडाडिती
कितेक झोंकती बळें । रसाळ लक्षिती फळें ॥ १५
तयामधें श्रीरंग हा । त्रिभंग ठाणसें पहा
अनेक रंग माजवी । सुरंग वेणु वाजवी ॥ १६
ध्वनीं विगुंतलीं मनें । बहु प्रकार गोध्रनें
श्रीकृष्णवेधु लागला । मनें मनु सुखवला ॥ १७
श्रीकृष्ण वेणु वाजवी । विधीभुगोल गाजवी
नदीतटें विराजवी । सुरेंद्र मान लाजवी ॥ १८
विशेष गोळियां कुळीं । सुढाळ बाळ गोकुळीं
सुरंग रंग अंगना । विलासती व्रजांगना ॥ १९
गुणें गुणीं गुणागळ्या । समर्थ योग्य मंडळ्या
वयें वयें परोपरी । क्रिडाभरें नदीतिरीं ॥ २०
विलासती उमा रमा । तयासमान उत्तमा
पवित्र शुद्ध निर्मळा । चटक दाविती कळा ॥ २१
व्रजांगनामधें हरी । परोपरी क्रिडा करी
मधुर वेणु वाजवी । तरंग रंग माजवी ॥ २२
वसंत काळ पातला । सुरंग रंग मातला
नुरेचि देहभावना । हिरोनि घेतलें मना ॥ २३
हरीचरित्र साजिरें । सगुणरूप गोजिरें
सवेंचि वेष पालटे । अधीक कृष्ण हा नटे ॥ २४
रसीक भाव भावना । महंत आणिती मना
अनंत गुण लाघवी । रसाळ गातसे कवी ॥ २५

# वामन.

[ १६००–१६७८ ]

[हा वसिष्ठगोत्री ब्राह्मण; मूळचा विजापूरचा राहणारा; याचें उपनांव शेषे. यानें वेदविद्येंत व शास्त्रविद्येंत बरेंच नैपुण्य संपादन केलें. त्याच्या विद्वत्तेवरून पंडित अशी पदवी त्याच्या नांवास जोडण्यांत आली. ह्याचा यथार्थदीपिका हा विद्वन्मान्य ग्रंथ, ज्ञानदेवांच्या भावार्थदीपिकेस न भुलून लिहिलेला आहे. वामन शेवटीं भक्तींत फारच रंगला व त्याचेंच पर्यवसान कृष्णलीलापर अगर परमेश्वरलीलापर रसाळ आख्यानें रचण्यांत झालें. वामनाच्या इतर काव्यांत जरी क्लिष्टता असली तरी या प्रकरणांत ती मुळींच नाहीं. ह्यांत प्रसाद व माधुर्य ह्याच गुणांची लूट आहे. वामनाच्या आधीं महानुभावांनीं संस्कृत छंदांत रचना केली असावी, परंतु सुंदर यमकांनी परिपूर्ण अशी पुष्कळशीं रचना याचीच असल्यामुळें यमक्या हें टोपण नांव व 'सुश्लोक वामना'चा हा प्रसिद्ध उल्लेखाचा मान त्यास मिळाला.

भृगु ऋषींनीं बळीकडून विश्वजित् यज्ञ करवून त्यास इंद्राचें पद मिळवून दिलें. अशा बलिष्ट बळीचा गर्वापहार करण्यासाठीं वामनावताराचें प्रयोजन. ह्या सर्व श्रुत प्रसंगाचें चित्र वामनानें पुढील श्लोकांत रेखाटलें आहे.]

## बळीचें स्वात्मनिवेदन.

[ शार्दूलविक्रीडित.]

इंद्राचें पद दैत्य-राज बळि तो विप्र-प्रसादें हरी ॥
तेव्हां कश्यप-मंदिरीं अदितिच्या दिव्य-व्रतें श्रीहरी ॥
झाला वामन, मुंजि तोचि समयीं होतांच भिक्षा-छळें ॥
सर्वस्व त्रि-पदें हरी, स्मर मना त्याचीं पदें कोमळें ॥ १

[भुजंगप्रयात.]

बळी-याग तो नर्मदेच्या तटाकीं । करी, आहुती शुक्र अग्नींत टाकी ॥
अकस्मात तों देखिलें वामनाला । सुखाचा गमे पूर्ण ठेवा मनाला ॥ २

[द्रुतविलंबित.]

करिं कमंडलु दंड मृगाजिन । त्रिजग-माप करी बटु वामन ॥
सँकल-वेद-विशारद चांगला । कटितटीं अति सुंदर मेखला ॥ ३

[शार्दूलविक्रिडित.]

तूं गा कोण? अपूर्व; कोठ वससी? हें विश्व जी तत्त्वता ।
पाळी कोण तुतें? अनाथ अजि मी त्राता न माता पिता ॥
द्यावें काय तुतें? त्रिपाद धरणी माझ्या पदें; फार घे ।
नेघें; वामन बोलिला बळिस कीं तृप्ति त्रिलोकीं रिघे ॥ ४

[वसंततिलका.]

पूजी बळी मग म्हणे बटु वामनातें ।
कीं माग जें तव अभीष्ट गमे मनातें ॥
देणार गा इतर मी मज काम नाहीं ।
तूं सांग जें पुरवितों तव कामनाही ॥ ५

[भुजंगप्रयात.]

म्हणे धन्य राया स्ववंशानुसारें । प्रभू बोलसी तूं तुझा बोल सारे
रणीं आणि दानीं तुझीया कुळीं रे । न दे पाठि कोणीच राया बळी रे ॥ ६

[इंद्रवज्रा.]

राया मला एक असे अपेक्षा । त्या वेगळी सर्व जनीं उपेक्षा
मोजूनि माझ्या त्रिपदींचि मातें । दे भूमि विप्र-प्रवरोत्तमातें ॥ ७

[द्रुतविलंबित.]

बळि म्हणे अतिसादर वामना । बहुत वाटसि गा बरवा मना
मज अशा भुवनत्रयपाळका । बहु न मागसि कां द्विजबाळका ॥ ८

# वामन.

[ १६००–१६७८ ]

[हा वसिष्ठगोत्री ब्राह्मण; मूळचा विजापूरचा राहणारा; याचें उपनांव शेषे. यानें वेदविद्येंत व शास्त्रविद्येंत बरेंच नैपुण्य संपादन केलें. त्याच्या विद्वत्तेवरून पंडित अशी पदवी त्याच्या नांवास जोडण्यांत आली. ह्याचा यथार्थदीपिका हा विद्वन्मान्य ग्रंथ, ज्ञानदेवांच्या भावार्थदीपिकेस न भुलून लिहिलेला आहे. वामन शेवटीं भक्तींत फारच रंगला व त्याचेंच पर्यवसान कृष्णलीलापर अगर परमेश्वरलीलापर रसाळ आख्यानें रचण्यांत झालें. वामनाच्या इतर काव्यांत जरी क्लिष्टता असली तरी या प्रकरणांत ती मुळींच नाहीं. ह्यांत प्रसाद व माधुर्य ह्याच गुणांची लूट आहे. वामनाच्या आधीं महानुभावांनीं संस्कृत छंदांत रचना केली असावी, परंतु सुंदर यमकांनी परिपूर्ण अशी पुष्कळशीं रचना याचीच असल्यामुळें यमक्या हें टोपण नांव व 'सुश्लोक वामना'चा हा प्रसिद्ध उल्लेखाचा मान त्यास मिळाला.

भृगु ऋषींनीं बळीकडून विश्वजित् यज्ञ करवून त्यास इंद्राचें पद मिळवून दिलें. अशा बलिष्ठ बळीचा गर्वापहार करण्यासाठीं वामनावताराचें प्रयोजन. ह्या सर्व श्रुत प्रसंगाचें चित्र वामनानें पुढील श्लोकांत रेखाटलें आहे.]

## बळीचें स्वात्मनिवेदन.

[ शार्दूलविक्रीडित.]

इंद्राचें पद दैत्य-राज बळि तो विप्र-प्रसादें हरी ॥<br>
तेव्हां कश्यप-मंदिरीं अदितिच्या दिव्य-व्रतें श्रीहरी ॥<br>
झाला वामन, मुंजि तोचि समयीं होतांच भिक्षा-छळें ॥<br>
सर्वस्व त्रि-पदें हरी, स्मर मना त्याचीं पदें कोमळें ॥ १

[भुजंगप्रयात.]

बळी-याग तो नर्मदेच्या तटाकीं। करी, आहुती शुक्र अग्नींत टाकी ॥
अकस्मात तों देखिलें वामनाला। सुखाचा गमे पूर्ण ठेवा मनाला॥ २

[द्रुतविलंबित.]

करिं कमंडलु दंड मृगाजिन। त्रिजग-माप करी बटु वामन ॥
सकल-वेद-विशारद चांगला। कटितटीं अति सुंदर मेखला ॥ ३

[शार्दूलविक्रिडित.]

तूं गा कोण? अपूर्व; कोठ वससी? हें विश्व जी तत्त्वता।
पाळी कोण तुतें? अनाथ अजि मी त्राता न माता पिता ॥
द्यावें काय तुतें? त्रिपाद धरणी माझ्या पदें; फार घे।
नेघें; वामन बोलिला बळिस कीं तृप्ति त्रिलोकीं रिघे ॥ ४

[वसंततिलका.]

पूजी बळी मग म्हणे बटु वामनातें।
कीं माग जें तव अभीष्ट गमे मनातें ॥
देणार गा इतर मी मज काम नाहीं।
तूं सांग जें पुरवितों तव कामनाही ॥ ५

[भुजंगप्रयात.]

म्हणे धन्य राया स्ववंशानुसारें। प्रभू बोलसी तूं तुझा बोल सारे
रणीं आणि दानीं तुझीया कुळीं रे। न दे पाठि कोणीच राया बळी रे ॥ ६

[इंद्रवज्रा.]

राया मला एक असे अपेक्षा। त्या वेगळी सर्व जनीं उपेक्षा
मोजूनि माझ्या त्रिपदेंचि मातें। दे भूमि विप्र-प्रवरोत्तमातें ॥ ७

[द्रुतविलंबित.]

बाळि म्हणे अतिसादर वामना। बहुत वाटसि गा बरवा मना
मज अशा भुवनत्रयपाळका। बहु न मागसि कां द्विजबाळका ॥ ८

[ रथोद्धता. ]

शब्द मी धरिन मस्तकावरी। ब्राह्मणा अधिक भूमिका वरीं
वाटसी बहुत नेटका मना। जे असेल वद नीट कामना ॥ ९

[ द्रुतविलंबित. ]

द्विजसुता तुझिया वचनामृतें। मज गमे उठतील शवे मृतें
निपुण दीससि निर्मळ आरसा। परि न मागसि अर्थचि फारसा ॥ १०
हरि म्हणे मजला इतुकें पुरें। त्रिभुवनात्मक होउनियां उरे
त्रिपदमात्रचि कार्य असें बरें। अधिक इच्छिति लोक न ते बरे ॥ ११

[ रथोद्धता. ]

शब्दभाव बळिलाहि नाकळे। शुक्र संनिध तयासि तो कळे
तो वदे भुज सभे उभारुनी। त्या बळीप्रतिच हांक मारुनि ॥ १२

[ द्रुतविलंबित. ]

अदितिच्या उदरीं हरि जन्मला। म्हणुनि ये समयीं कळलें मला
विभवराज्य समस्त हरील रे। यशहि होइल विस्तृत अस्त रे ॥ १३
म्हणुनि सांगतसे तुज मी अगा। बस तुं मौनपणें अथवा उगा
म्हणसि देइन यावरिही जरी। रिघसि दाटुनि पातकपंजरीं ॥ १४

[ उपजाति. ]

संकल्प जो तूं करिशील बापा। न देववे जाशिल सद्य पापा
पदद्वयीं विश्व पुरेंचि जेव्हां। जावें तुवां कीं नरकासि तेव्हां ॥ १५
करूनि संकल्प न दे द्विजा तो। प्राणी स्वपापें नरकासि जातो
आधींच नेदीं म्हणतां भला हो। घेसी झणीं वैखरि मात्र लाहो ॥ १६

[ द्रुतविलंबित. ]

जरि विचारुनि गोंविसि वैखरी। तरिच होइल जाण अगा खरी
म्हणुनि शुक्र अजी बहु बोलतो। परि तयीं वदला बळि बोल तो ॥ १७

[भुजंगप्रयात.]

विचारूनि आचार्यवाचा निदानीं । बळी तो धरी बुद्धि सर्वस्वदानीं
म्हणे बोलतां जी जरी सत्य वाणी । द्विजा केविं वाचा वदों दैन्यवाणी ॥ १८

[मालिनी.]

निगमविधिविधानें मांडुनी हे पसारे
यजुनि विविधयागीं वंदिती ज्यास सारे
वरद हरिच तो हा विप्र कोण्हीच हो जी
किति तरि मज मागो भूमि देतों अहो जी ॥ १९

[इंद्रवज्रा.]

सर्वस्वदानीं बळि सिद्ध झाला । पूज्यासनीं बैसवि त्या द्विजाला
प्रक्षाळि त्या श्री-पदपंकजातें । ध्याती रमा-अब्जभवादि ज्यांतें ॥ २०

[वसंततिलका.]

आली समीप यजमानिण पट्टराणी
पाहे हरीस जिचि हो न पुरे शिराणी
ओती करें कनकपात्र धरून वारी
सर्वस्व दे पति तयास न जे निवारी ॥ २१

[उपजाति.]

करूनि संकल्प करांत पाणी । घालूं म्हणे पूजुनि चक्रपाणी
निघे न झारींतुनि नीरबिंदू । म्लानत्व पावे बळिचा मुखेंदू ॥ २२
कीं शुक्र झारींत रिघोनि गोळा । करून अंगें अजि होय बोळा
फोडी हरी घालुनि दर्भ डोळा । दिसे जनां विप्रकुमार भोळा ॥ २३
ऐशा रिती पूजुनि दानवारी । घाली करीं तें मग दानवारी
म्हणे स्वपादीं अजि भूमि मोजीं । जे अर्पिली; त्याचि पदा नमो जी ॥ २४

[वसंततिलका.]

संकल्पयुक्त पडतां स्वकरांत पाणी
वाढे त्वरें करुनि वामन चक्रपाणी

पाताळिं पादतळ मस्तक सत्यलोकीं
कर्णीं दिशा दिनमणी नयनावलोकीं ॥ २५

[ उपजाति.]

एका पदें भूमि भरोनि थोडी। दुजा पदें अंडकटाह फोडी
दे तीसरा पाद म्हणे बळीला। म्हणोनि पाशीं दृढ आकळीला ॥ २६
या कारणें प्रार्थुनियां हरीची। करी स्तुती प्रेमरसें विरिंची
प्रल्हाद आजा बळि भूपतीचा। आला महाभक्त रमापतीचा ॥ २७
म्हणे तुवां हे दिधली त्रिलोकी। नेली तुवां पूर्ण कृपावलोकीं
केला तुवां दंड कृतार्थ झाला। प्रल्हाद इत्यादि वदे अजाला ॥ २८
पत्नी बळीची जगदीश्वरातें। वंदोनि बोले कमळावरातें
म्हणे धनी तूंचि चराचरांचा। वृथाभिमान प्रभुजी नरांचा ॥ २९
सर्वांचिया आइकतां स्तुतीतें। बोलावुनी त्याच महामतीतें
म्हणे बळी दे तिसऱ्या पदातें। कीं भोगि पापें बहु आपदांतें ॥ ३०
करूनि संकल्प न देसि जेव्हां। जाशील राया नरकासि तेव्हां
म्हणे बळी देइन देवराया। आहें स्वसंकल्प खरा कराया ॥ ३१
तसा न भीं मी नरकासि देवा। या पाशबंधासहि वासुदेवा
न भीं सुरांच्या जयवाद्यनादा। भीतों जसा मी अपकीर्तिवादा ॥ ३२
करूनि संकल्पहि तूज दे ना। कोणी मला धन्य जगीं वदेना
माझ्या शिरीं ठेव निजा पदातें। जें छेदितें सर्वहि आपदांतें ॥ ३३

[ द्रुतविलंबित.]

पदयुगें भुवनत्रय मोजिलें। पद तिजें बळिचे शिरिं योजिलें
पदनखें विधि–अंड विदारिलें। पदतळेंचि जगत्-त्रय तारिलें॥ ३४

[ उपजाति.]

करी बळी स्वात्मनिवेदनातें। संतोष झाला मधुसूदनातें
दैत्येंद्र तत्काळचि मुक्त केला। प्रेमामृताचा हरि हा भुकेला ॥ ३५

++++++

मराठी ग्रंथ संग्रहालय
नं. ........

# मुक्तेश्वर.

[ १६०८-१६५९ ]

[हा एकनाथाच्या मुलीचा मुलगा. याच्या आईचें नांव गंगाबाई. बापाचें नांव चिंतामणि. हा दत्तभक्त होता. ह्या योगीश्वर देवतेचे लीलाविश्वंभर ह्या नांवानें ह्यानें ग्रंथभर उल्लेख केले आहेत. ह्याची उपलब्ध रचना सरासरी २०००० आहे. ह्याचीं आदि, सभा, वन, विराट व सौप्तिक हीं भारताचीं पांच पर्वें उपलब्ध आहेत. ह्याचें श्लोकबद्ध रामायणहि आहे. तथापि ह्याची प्रतिभा ओंवीच्या छंदांत फारच विलसते. ह्याची ओंवी प्रौढ, नोकझोकाची व अत्यंत थाटाची अशी असल्यामुळें ओंवी ज्ञानेशाची ' असें असून ' ओंवी मुक्तेशाची ' असा पाठ सुचविण्यांत कित्येकांस मोहांत घालते. थोडक्यांत चटकदार वर्णन करणें हें त्यास हातच्या मळाप्रमाणें वाटतें. वीरांची सिंहगर्जना, मल्लांचें द्वंद्वयुद्ध अगर लढाईचे प्रसंग आले कीं त्याची प्रतिभा उठाण घेते. त्याच्या भाषेतील तडफ व आवेश अवर्णनीय आहे. त्याची सौंदर्याची कल्पनाही उच्च प्रकारची आहे. माधुर्य, प्रसाद व ओज ह्या तिन्ही गुणांचा त्याच्या कवितेंत उत्कर्ष आढळतो. बाहूंस स्फुरविण्यांत जसा तो पटाईत तसाच तो दयेचे पाझर फोडण्यांत व फोडविण्यांत चतुर आहे. मोरोपंताइतकी त्याची रचना असती तर मोरोपंत श्रेष्ठ कीं मुक्तेश्वर श्रेष्ठ हा वादच उत्पन्न झाला नसता.]

## भीमजरासंधयुद्ध.

कंसारी संसारगजकेसरी । हांसोनि बोले श्रीकृष्ण शौरी
“ पांडुपुत्र हे निर्धारीं । भीमार्जुन जाण पां ॥ १
मागें अपराध केले क्षमा । लोटली मर्यादेची सीमा
ते कार्याकारणें पुरुषाधमा । शेवटीं फळ भोगीं कां ॥ २

सरला सुकृताचा तंतु । आयुष्यतैला झाला अंतु
माझिये हस्तीं व्यजनवातु । भीमरूपें उदेला ॥ ३

असेल वांचावयाची आर्ती । तरी रक्षिल्यां करी बंधमुक्ती
आम्हां तुम्हां अर्थाअर्थीं । वैरसंबंध असेना ॥ ४

करीं रायांचें बंधमोचन । कीं युद्धा उठीं न लागतां क्षण
यावेगळा विचार आन । करणें आतां घडेना ॥ ५

तिघांमाजि जो आवडे । त्यासीच भिडिजे इडेंपाडें "
मागध म्हणे, 'मूर्खा! तोंडें । जल्प करिसी वाचाटा ॥ ६

तूं बहुरूपी खेळसी सोंगें । कोणतें युद्ध जिंकिलें आंगें
वेडींबागडीं भात्रिकें भणंगें । तुझें शूरत्व त्यांमाजी ॥ ७

पार्थ पृथेचें सुकुमार बाळ । शास्त्राभ्यासीं गेला काळ
मजसी अयोग्य परि अळुमाळ । भीम कांहीं दिसतसे ॥ ८

तोहि मंद जड आळशी । बहुत आहार निद्रा त्यासी
आयुष्य सरलें म्हणून ऐसी । बुद्धी उदेली तुम्हांतें ॥ ९

तिघांतें हाणोनि चडकणा । क्षणामाजी मेळविन मरणा
बळें सर्पाचिया सदना । मंडूक वस्ती पावला ' ॥ १०

' मंडूक किंवा तिघे गरुड । आतांचि होईल हा निवाड
समय प्राप्त झालिया वाड । बोल टाकीं माघारा ' ॥ ११

ऐसें बोलतां चक्रपाणी । उभे ठेले समरांगणीं
जरासंधें राज्यासनीं । अभिषेकिलें सहदेवा ॥ १२

प्रधानातें निरोपी मुखें । राज्य रक्षावें अति विवेकें
होणार तें होतसे सुखें । निर्भय सर्वीं असावें " ॥ १३

सरसावुनी वीरगुंठी । भीम लक्षिला दारुण दृष्टीं
जैसा मदोन्मत्त करटी । सिंहेश्वरें लक्षावा ॥ १४

२३५९

भीमा अंगीं वीरश्रीचा लोट्ट । धरितां न धरवे अतिउद्धट्ट
अगस्ती धांवे समुद्र घोट्टं । तैसा झगटे पुढारा ॥ १५
दोघे पिटिती पाणितळें । जानुमूळें बाहुमूळें
मही ताडितां पादतळें । शैलमौळें थरकती ॥ १६
दोघे स्मरती कुळदैवतें । मागध मागे महेशातें
"शत्रुयाचको माझेनि मृत्यें । यशभिक्षा लाधो मज" ॥ १७
भीमें स्मरोनि श्रीकृष्णचरण । म्हणे, 'होवोनी मागधहनन
सिद्धि पावो राजसूययज्ञ । आर्त पुरो पांडूची' ॥ १८
किरीट काढोनी हस्तकीं । केश आंवळिले मस्तकीं
चंड गर्जना करिती मुखीं । काळ कांपे चळचळां ॥ १९
धांवोनि भीमाची वीरगुंठी । मागधें कवळोनियां मुष्टी
दक्षिण हस्त सूदला कंठीं । काळपाशासारिखा ॥ २०
दांत खाऊनि करकराटी । गुडघा स्थापिला हृदयपुटीं
सावध म्हणे कृष्ण जगजेठी । बापा! भीमा बाळिष्टा ॥ २१
भीमें भैरवाकार दृष्टी । हृदयीं वोपिली वज्रमुष्टी
सोडवूनि मगरमिठी । झिंजाडोनि, लोटिला ॥ २२
तेणें मागुती उठोनि विकळ । पडिला जैसा विशाळ ताळ
पुढती उठोनी उतावीळ । भीम मध्यें कवळिला ॥ २३
दोन्ही कोंपर दोन्ही मुष्टी । चार आघात वोपिले पृष्ठीं
मागध क्षोभोनी उफराटी । हुमणी हाणी मस्तकीं ॥ २४
झोंबी सोडवूनी तवकें । मस्तका मस्तकें देती थडके
सहस्रसंख्या, लोट भडके । अशुद्धाचे चालती ॥ २५
हस्त वोढिती तोडावया । पाय कवळती मोडावया
डोळे टोचिती फोडावया । पाडावया दशनांबें ॥ २६

करप्रहार लत्ताप्रहार । मुष्टिप्रहार मस्तकप्रहार
मोजोनि मारिती शतसहस्र । 'उसणें घे घे' म्हणोनि ॥ २७
मस्तकीं वाहती करून मोट । भूमीं टाकिती जैसा घट
तळीं पाषाण होती पिष्ट । अंगलोटें दोघांच्या ॥ २८
व्याघ्रा ऐसे क्रोधानळीं । झोंबो पाहती कंठनाळीं
सिंहा ऐसे कुंभस्थळीं । भेदूं म्हणती मस्तकें ॥ २९
सर्पा ऐसे फूत्कारती । सिंहा ऐसे हुंकारती
वृषभा ऐसे फुंफाटती । उफाळती इसाळें ॥ ३०
मुष्टिघातांचिया ध्वनी । थरथराटें थरके धरणी
वोथरोनि पाताळफणी । मार्ग पाहे पळावया ॥ ३१
निराहार निरुदक । विसांवा न घेतां पळ एक
तेरा दिवसपर्यंत देख । युद्ध झालें दोघांसी ॥ ३२
कार्तिकाचिया प्रथम दिवशीं । संग्राम मांडला दोघांसी
लोटलिया त्रयोदशी । निशी झाली झुंजतां ॥ ३३
चतुर्दशीचिया राती । मूर्च्छा पावला मागधनृपती
ते वेळीं संकेत दावी हातीं । पांडवातें माधव ॥ ३४
'पाय कवळोनिया करतळीं । चिरोनी करावीं दोन्ही फळीं
जरेनें सांधिला तो उखळीं । सांधा वेगीं बलिष्ठा ॥ ३५
यावेगळा उपाय आन । करितां मागध न पावे मरण
आतांचि होऊनि सावधान । युद्ध करील मागुती' ॥ ३६
ऐसें बोले जंव मुकुंद । तंव सावध झाला जरासंध
धांवला जैसा द्विरद मदांध । झगटे विशालद्रुमासीं ॥ ३७
प्रवर्तला महामारीं । पतंग जैसा वैश्वानरीं
तैसा मुष्टिप्रहारीं । रागें ताडी भीमातें ॥ ३८

भीमें रगडोनियां दाढा। मध्यभागीं कर्षिला गाढा
माथां वाहोनियां भवंडा। चक्राकार दाविला॥ ३९

तेथोनि टाकिला भूतळीं। लात वोपिली वक्षःस्थळीं
वज्रें ताडोनीयां मौळी। शक्र भंगी पर्वता॥ ४०

तेंवीं पाडोनीयां उताणा। वामपादें दक्षिणचरणा
रगडोनि सव्य पाद जाणा। उभयहस्तीं कवळिला॥ ४१

आसडोनी बळें उद्भटें। मधें उधडिला तडतडाटें
अशुद्ध नदीचे खळखळांटें। रंगभूमिके लोटले॥ ४२

जडोनि मागुता उठिला झुंजा। देखोनि आश्चर्य अर्जुनाग्रजा
पुढती धरोनी महाराजा। दुभागिलें हस्तकें॥ ४३

तिसऱ्यानें देहाकार घडिला। भीम हांसोनी आवेशला
पायीं कवळोनि वहिला। मस्तकावेऱ्ही मागुता॥ ४४

शतवार देऊनीयां फेरे। भूमीं त्राहाटिला अंगभारें
चिरोनि सांडिला द्विकरें। दोहींकडे देहुडीं॥ ४५

ते न लागती एक शवा। मागध निःशेष मुकला जीवा
झाला भरंवसा पांडवा। आणि माधवा पार्थासी॥ ४६

जयजयकार करूनि टाळी। उभयलोकीं पिटिली टाळीं
देवीं वोपिल्या पुष्पांजळी। कृष्णभीमामस्तकीं॥ ४७

++++++

# मोरोपंत.

[ १७२९–१७९४.]

[ हा जातीचा कऱ्हाडा ब्राह्मण. याचें उपनांव पराडकर. हा बाबूजी नाईक बारामतीकर ह्यांकडे आश्रित म्हणून पुराण सांगून रहात असे. संस्कृत भाषा त्यास चांगली अवगत होती. ह्याची राम ही उपास्य-देवता. ह्यानें १०० प्रकारें रामायणें लिहून, आपलें निरनिराळया छंदां-वरचें व तसेंच भाषेवरचें प्रभुत्व उत्तम रीतीनें निदर्शनास आणिलें. यानें महाभारताचेंही संक्षिप्त भाषांतर केलें आहे. ह्याची भाषा संस्कृत-प्राकृतमिश्रित, प्रौढ व भारदस्त अशी आहे. भाषाशुद्धतेकडे ह्याचें बरेंच लक्ष असे. मुक्तेश्वरास जशी ओंवी आवडते तशीच व तितकी पंतास आर्या आवडते. मुक्तेश्वराइतका चटकदारपणा मोरोपंतांत नाहीं. पंताच्या काव्याची यमकामुळें हानीच जास्त झाली आहे. यमकामुळें ह्याच्या काव्यांत दुर्बोधता, अनवश्यक उपमा वगैरे दोष उत्पन्न झाले आहेत. तथापि वीरांचीं युद्धें वर्णितांना व देवाशीं सलगीनें भाषण करतांना हीं यमकें एवढीं रसापकर्षक होत नाहींत. ह्यानें मराठींत विपुल रचना करून भाषा बरीच संपन्न केली. मुक्तेश्वरांचें भीमजरासंधयुद्ध व पंताचें गदायुद्ध मुद्दाम उताऱ्यांत घेतलेलें आहे. त्यावरून ओज गुणांत कोण श्रेष्ठ आहे हें ठरविण्याचा ज्यानें त्यानें आपल्या मनाशीं यत्न करावा.]

## गदायुद्ध.

भीम म्हणे, 'रे अधमा! केलें त्वां आणि जें तुज्या तातें
चित्तांत आठवावें पदरीं फळ घ्यावया कुजाता तें ॥ १

विष चारिलें बुडविलें डोहांत, करावयासि वध मातें
स्मर वारणावतीचें जतुसद्मच्छद्मकर्म अधमा तें ॥ २

कपटद्यूतें हरिलें सर्वस्व पुढें करून कितवातें
नेली सभेंत साध्वी, व्हावें शिवतां जिला चकित वातें ॥ ३
ऐसीं अनेक पापें केलीं त्वां भरतकुळकंलका रे
तूं जेंवि दुर्गुणांहीं, न असा दशतुंड ही अलंकारे ॥ ४
भीष्मप्रभु शरतल्पीं पडला दुष्टा तुज्या चि पापानें
त्वां बहुकुळें बुडविलीं, घननादाच्या असीं न बापानें ॥ ५
गुरु, कर्ण, शल्य वधिले भगदत्ताधिक अनेक शत राजे
मथिले त्वदनुज हि म्हणत होते आम्हां 'रणांत न तरा' जे ॥ ६
जेणें कपटद्यूतें करुनि दिली हे तुला वश कु निखिळा
मदुरांत पुन्हां परिभवतापाचा हेतु लाव शकुनिखिळा ॥ ७
क्षम सज्जनच्छळासचि सर्व तुम्ही पाप, अक्षम रणाला
पांडव न हेतु तुमच्या, हे फिरले तेचि अक्ष, मरणाला ॥ ८
उरलासि एक, सोदर गेले तिकडे तुलाहि पाठवितों
तुज देय फळ दिलें किति, किति उरलें हें मनांत आठवितों' ॥ ९
कुरुराज म्हणे, 'मंदा मेळविलें बहु विकत्थनें काय?
'हाय!' म्हणवितों युद्धश्रद्धेसह भंगितों तुजा काय ॥ १०
न्यायें शत्रु मज गदायुद्धीं जिंकी असा असे कोण?
तूं महिष तोंचि, जोंचि न शोणगदाशक्तिदष्टिचा कोण ॥ ११
न्यायें मज जिंकाया न समर्थ गदारणीं सुनासीर
ये भूमींत, वितिलका व्हाया त्या पांडुच्या सुना, सीर ॥ १२
वदलासि दुर्विचेष्टित माजें जें जें खरेंच भीमा तें ॥
मंदा! न तदेकप्रतिकृत घडलें म्हणुनि लाज भी मातें ॥ १३
म्यां करुनि तुम्हां वल्कलधर, दीन, सुचिर वनोवन फिरविलें
अज्ञातवास, दास्यहि करवुनि, निजतेज दुःसह मिरविलें ॥ १४

तुज लाविलें स्वतेजें म्यांच कढी भात वरण घाटाया
घाटाया प्राज्य पुरण, पापड पोळ्या प्रभूत लाटाया ॥ १५

माजे तुझेहि मेले आप्त बहु; क्षय समान दोघांचा
काळें जैसा घटजें त्या पूर्वापरसरस्वदोघांचा ॥ १६

भाग्यें घडेल जरि तरि मज परम श्लाघ्य संगरीं पतन
जतन क्षत्रिय न करिति, जोडिति नाकीं तनुव्ययें वतन ॥ १७

अद्यापि मला कोणी धर्में जिंकी असा असे न गदी
छद्में वधितां होइल तुमची अपकीर्ति, विष चि ती अगदीं ॥ १८

कौंतेया त्वां शारदवारिधरापरि वृथा न गर्जावें
बळ असल्या दावावें प्रथम, विकत्थन समस्त वर्जावें ॥ १९

कौरववर कोपानें करिपतिला केसरी तसा पाहे
राहे निष्कंप पुढें, शक्रा बळसा मरुत्सुता बाहे ॥ २०

भीम म्हणे धर्माला, 'रामापासूनि जेंवि पामर तो
मजपासुनि हा दुर्मति दुर्योधन तेंवि भूमिपा मरतो' ॥ २१

दुर्योधनाप्रति म्हणे, "केलें अघकर्म आठिव रिपो ! तें
जें घेतलें बुडाया बहु ओझें, जेंवि पाठिवर पोतें ॥ २२

नृपति म्हणे, " बोलें चि न होतो जन विप्रताप शोभित रे
भिवविशि कोणा ? जाले न कुरु वरुनि विप्रता पशो भितरे ॥ २३

चिरकाळ मनीं होतें व्हावें तुजसी भलें गदायुद्ध
नवसासि पावले सुर, कीं माजा भाव समजला शुद्ध " ॥ २४

वाग्युद्ध करुनि, करिती अतुल गदायुद्ध ते गदीश, तदा
वाहे बहु रक्त, गमे तन्मूर्ति सरस्वती नदी शतदा ॥ २५

गमलीं साक्षाच्चित्रें प्रेक्षककटकें समस्त बापा ! तीं
ढवळीं न पाहतां त्यां स्वतुळगदायुद्धकौतुका पातीं ॥ २६

दुर्योधनें गदेनें पार्श्वींच प्रथम ताडिला रागें
परि तो प्रहार नाहीं गणिला कुंतीसुतें महाभागें ॥ २७

तदनंतर कुरुराजें केला आघात मस्तकीं क्रोधें
बोधें भोग तसा तो धैर्यें त्या साहिला महायोधें ॥ २८

कुरुपतिस दिला भीमें उग्र गदेचा असा रपाटा कीं
त्या वपु म्हणे, ' भरंवसा माजा राज्या असारपा टाकीं ' ॥ २९

डोहांतुनि गजसा नृप मोहांतुनि निघुनि दे तडाखा तो
भीम हि पडला, गमला पविपातें देश तो तडा खातो ॥ ३०

उठला भीम मुहूर्तें, धरुनि पुन्हां आयुधा, रणाला हो
पर म्हणति 'विधे ! हा तव सदयेक्षण आयुधारणा लाहो' ॥ ३१

कार्यव्यग्रा माता सूनुकडे जेंवि दाइला धाडी,
भीमदया तसि दृष्टिसि, तो जय सव्योरुतें करें ताडी ॥ ३२

संज्ञेतें धरुनि मनीं तो निजसंधेसि आठवी राज्या
क्रोधांधा न दिसावे दिग्गज दिक्पाल आठ वीरा ज्या ॥ ३३

बसतां गदा गदेवरि किटळें बहु उसळती अहा त्यांचीं
तेजें जशीं विजांचीं; झांकिति नयनें नृपा ! पहात्यांची ॥ ३४

चुकवावया प्रहार व्योमीं उडतांचि ऊरुवर ताडी,
मांड्या मोडुनि मारुति महिवरि सहसा सुयोधना पाडी ॥ ३५

पांचाळ मुदित झाले, जैसे होतांचि वृत्रहानि सुर
होय वृकोदर मारुनि कुरुपतितें जेंवि वृत्रहा निसुर ३६

पतितातें भीम म्हणे, " रे कुर्वधमा ! कुबुद्धिच्या कंदा !
' गौगौं ' म्हणोनि हांसत होतास सतीस तूंच कीं मंदा ॥ ३७

"त्या कर्माचें घे फळ," ऐसें गर्जोनि वामपादानें
शिर तुडवी, ईश्वरसा दे भीम कृतानुरूप बा ! दानें ॥ ३८

## संशय–रत्नमाला.

उठतां बहु त्वरेनें 'कोठें जातां' असें तुम्हां देवी
पुसती झाली जाणों, पुसतां ज्ञाता पुढें न पद ठेवी ॥ १
किंवा नारद आला आलापीत स्वकीय सच्चरितें
प्रेमळ गीत तुम्हांला हरि हरिणापरिस बहुत वश करितें ॥ २
कीं माझें दुर्दैव प्रभुच्या मार्गांत आडवें पडलें
शरणागत-भय-शमना ! यास्तव येणें तुझें नसे घडलें ॥ ३
किंवा मजहुनि दुसरा कोणी बहु दीन दास आढळला
तच्छुभ-दैव-समीरें, त्यावरि करुणा-घन प्रभू वळला ॥ ४
अथवा येतां झालां तन्मय शिवतांडवांत कैलासीं
केला असेल गरुडें गर्व पुन्हां काय त्याच बैलासीं ॥ ५
बहुधा बळिचें द्वार क्षणभरिही सोडितां नये देवा
न चुकावी छल-पाप-प्रायश्चित्तार्थ साधुची सेवा ॥ ६
प्रायः सुमुहूर्ताचा शोध करायासि लागला वेळ
होय महत्कार्य परि प्रभुचा तों नित्य सहज हा खेळ ॥ ७
कीं मी भागवतांचा भाग असें आणिलें मनीं स्वामी
हें सत्यचि परि कैंचा हा भेद प्रभुवरा ! तुझ्या धामीं ॥ ८
किंवा तुज एकाकी पाहुनि खळ दैत्य आडवे आले
फुटतां सागर सिकता-सेतूचें काय त्यापुढें चाले ॥ ९
किंवा तुज गुंतविलें भजकीं, परि ते दयार्द्र या रंकीं
उद्धरित्यासि न सज्जन गुंतविती गाय कष्टतां पंकीं ॥ १०
किंवा चुकतें कांहीं स्तवनीं तेणोंचि मागुता बससी
तरि हें मन्मूर्खत्व प्रभु तूं दोष-ज्ञ ही तसा नससी ॥ ११

कीं कळवाया कर्में धर्में तुज दाविली असेल वही
त्वद्दृष्टिपुढें राहे ऐसा पापांत त्या नसे लव ही ॥ १२
कीं न श्रवणीं गेली ही माझी हांक, हा कसा तर्क
काशि गुरु-जनीं सतीची शिवला ज्या कुमुदिनीस असदर्क ॥ १३
अथवा स्वस्थाचि अससी कीं घेतो नाम रक्षणीं शूर
हें सत्य परि प्रबळहि बळ दुर्बळ जरि रणीं धणी दूर ॥ १४
कीं भीतो भ्रांत वृथा मृग-जळ-मग्नासि काय तारावें
सत्याचि हें, परि शिशुचें भय जाया बागुलासि मारावें ॥ १५
कीं कांहीं व्रत-नियमीं बोलों चालों नये असें झालें
तरी दीन-रक्षणाहुनि अधिक-फळ-व्रत कधीं मना आलें ॥ १६
कीं हांक ऐकतांचि प्रभुला हा रक्षणार्हसें वाटे
वाटे या दुःशील-ग्रीष्मीं तव नव दया-नदी आटे ॥ १७
कीं पावावें समयीं सदय मनांतूनि योजिलें जरि तें
तरि जेंवि रुक्मिणीचे चित्ता माझें अधीर मन करितें ॥ १८
किंवा पुराण-पुरुषा संप्रति बहु भागलासि या कामीं
तुज नीज लागली तों सजलों मारावयासि हांका मी ॥ १९
किंवा बरी परीक्षा केल्यावांचूनि न प्रसाद करां
तरि वरि तसाच आंतहि उगाळितां कोळसा प्रयास करा ॥ २०
कीं धाडिलें पुढें निज-नाम करो सर्व सिद्धता आधीं
ऐसें प्रभो म्हणावें तरि तुमचीं चरण—सारसें साधीं ॥ २१
कीं आर्जविला नाम प्रतिनिधि हा अमृत उधळितो स्वैर
न पुसे, न भी, न ऐके, यास्तव दोवांत लागलें वैर ॥ २२
कीं संप्रति अभय दिलें कलिला चालावया वरें राज्य
परि कोण प्राणि सदय शिंपील बळें दवानळीं आज्य ॥ २३

किंवा म्हणसि समर्थोऽहं कर्तुमकर्तुमन्यथा कर्तुं
दीनावनाविणें क्षण देइल दयिता दया कशी वर्तुं ॥ २४
कीं अक्ष-क्रीडेनें हरिलें मन, सर्व कार्य जी चुकवी
तरि बद्ध-मूळ एकाचि भजदवन-व्यसन वर्णिती सु-कवी ॥ २५
कीं वैकुंठीं पुष्कळ भक्त तिळ स्थळ नसे नसावेंची
वसवा पुरें, पुरे कां म्हणतां, धनवंत कण कसा वेंची ॥ २६
कीं बहुकाळ विसरला फारचि संकोचला सखा लाजे
येत असेल हळुहळू म्हणुनचि एकहि न पादुका वाजे ॥ २७
कीं नाम-स्पर्श-मणि स्पर्शे परि काय करिल खापर मी
स-दयहि घालील कसा दुर्दैवाला सुखीं सखा परमीं २८
कीं प्रथम मदपराधें तारूं ना म्हणुनि वाहिल्या आणा
प्रभुजी पुरे प्रतिज्ञा, भारत-रण-वृत्त तें मनीं आणा ॥ २९
कीं याचकांसि देतां सरले चारीहि मुक्ति-धन-राशी ॥
भक्तिच मज द्या, द्यावें देवाला अमृत, योग्य न नराशी ॥ ३०
कीं जरि म्हणाल असतां जन्म-शुचि स्व-पद-नीर-जा मिळतो
तरि झकवितां मला अजि, चुकला नव्हताचि कीं अजामिळ तो? ३१
कीं वाटलें खळाला मुक्ति न द्यावी जशी सुधा सर्पा
तरि ती अघादिकांला द्या, सु वरा भक्ति मात्र मज अर्पा ॥ ३२
कीं अकृपा नावडती आवडती स्त्री कृपा तिचें प्राज्य
लोकत्रयांत देवा पहिलीचें काय एक मी राज्य ॥ ३३
कीं गमलें जरि आधीं म्हणतों दावा स्व-पाद या लोकीं
जो जो वांछिल जें जें तें द्यावें हें मुधा दयालो कीं ? ॥ ३४
कीं आज काल ज्याचा तेणें अधिकार घेतला रागें
तरि हें अश्रद्धेय प्रभ्वन्तर ऐकलें नसे मागें ॥ ३५

कीं भेटि बहुदिसां भय भेटाया दीन—बंधुला वाटे
तरि भेटावें विधिनें गेले जाताति साधु ज्या वाटे ॥ ३६

कीं स्त्री-पूर्व-शिखंडी त्यातें समरांत भीष्म पाहेना
मीही पहिला पापी, तैसें करितां सु-कीर्ति राहेना ॥ ३७

कीं भीशी मज एका उद्धरितां लागतील फार झटें
तरि कोणाहि न कळतां न्यावा झांकूनि दास पीत-पटें ॥ ३८

कीं लक्ष-भोजनापरि केला संकल्प संपला देवा
तरि दाते क्षुद्विकला मग न म्हणति काय या बसा जेवा ॥ ३९

कीं मीच एक उरलों पापी, हें बीज ठेविलें जतन
वतन स्वकीय मज कां करितें त्वन्नाम मंगलायतन ॥ ४०

कीं कार्यबहुत्वें तुज फावेना यावया जगत्पाळा
तरि रूप घ्या दुजें, ती विद्या कंठीं वसे जशी माळा ॥ ४१

कीं मागें गुप्त उभा असासि प्रेमें उभारुनी बाहे
तरि काय बाळकाचे तूं सादर बोल ऐकशी बा हे ॥ ४२

++++++

# होनाजी बाळ.

[हा जातीनें गवळी. ह्याच्या बापाचें नांव सयाजी, उपनांव शेलारखाने. ह्यांच्यांत तमासगिराचा धंदा पिढिजाद असे. ह्याचे मराठे वीरांच्या मनोभावना दाखविणारे कित्येक पवाडे आहेत. श्रीकृष्णलीलापर लावण्याही आहेत. शें सवाशें वर्षें महाराष्ट्राला चटक लावून सोडणारी 'घनश्याम सुंदरा श्रीधरा' ही भूपाळी त्याचीच आहे. ह्याचा संस्कृत भाषेशीं परिचय बऱ्यापैकीं होता असें दिसतें. त्याच्या नांवापुढें येणारें बाळा नांव, त्याच्या लावण्या व गाणीं म्हणणाऱ्याचें आहे. हा पेशवाईच्या अखेरच्या दिवसांत उदयास आला. हा इंग्रजी थोडीशी पाहून वारला असावा.]

## भूपाळी.

घनश्याम सुंदरा श्रीधरा, अरुणोदय झाला
उठिं लवकरि वनमाळी उदयाचलीं मित्र आला ॥ ध्रु०॥
सायंकाळीं एकेमेळीं द्विजगण अवघे वृक्षीं
अरुणोदय होतांच उडाले चरावया पक्षी ॥
अघमर्षणादि करुनि तापसी तपाचरणदक्षी
प्रभातकाळीं उठुनि कापडी तीर्थपंथ लक्षी ॥
करुनि सडासंमार्जन गोपी कुंभ घेउनि कुक्षीं
यमुनाजळासि जाति मुकुंदा, दध्योदन भक्षीं ॥
मुक्तता होऊं पाहे कमलिनीपासुनि भ्रमरा
पूर्वदिशे मुख धुतलें, होतसे नाश तिमिरा
उठिं लवकरि गोविंदा सांवळ्या नंदकुमरा ॥

मुखप्रक्षालन करीं अंगिकारीं भाकरकाला
उठिं लवकरि वनमाळी उदयाचलीं मित्र आला ॥ १

घरोघरीं दिप अखंड त्यांच्या सरसावुनि वाती
गीत गाति सप्रेमें गोपी सदना येति, जाती ॥
प्रवर्तोनि गृहकामीं रंगावळि घालूं पहाती
आनंदकंदा प्रभात झाली ऊठ सरलि राती ॥
काढिं धार क्षीरपात्र घेउनी धेनू हंबरती
द्वारिं उभे गोपाळ हांक मारुनि तुजला बाहती ॥
हे मुक्ताहार कंठीं घालिं, या रत्नमाळा
हातिं वेत्रयष्टी बरवी, कांबळा घेइं काळा
ममात्मजा मधुसूदना हृषिकेशि जगत्पाळा ॥
लक्षिताति वांसुरें हरि धेनु स्तनपानाला
उठिं लवकरि वनमाळी उदयाचलीं मित्र आला ॥ २

प्रातःस्नानें करुनि गोपिका अलंकारें नटती
कुंकुमादि चर्चुनी मंथनालागीं आरंभिती ॥
प्रेमभरें अंतरांत वदनीं नामावलि गाती
अर्घ्यदान देउनियां द्विजगण देवार्चन करिती ॥
नेमनिष्ठ वैष्णव ते विष्णूपूजा समर्पिती
स्मार्त शिवार्चन-सक्त शक्तितें शाक्तहि आराधिती ॥
ऋषिगण आश्रमवासी, जे निरंजनीं धाले
अरुणोदयिं आपुलाले, ध्यानीं निमग्न झाले
पंच पंच उषःकालीं, रविचक्र निघों आलें ॥
एवढा वळ निजलासी म्हणुनि हरि समजेल नन्दाला
उठिं लवकरि वनमाळी उदयाचलीं मित्र आला ॥ ३

विद्यार्थी विद्याभ्यासास्तव सादर गुरुपायीं
अध्यापन गुरु करिति शिष्यही अध्ययना उदयीं ॥
याज्ञिक जन कुंडामींध आहुति टाकिताती पाहीं
रविप्रभा पडुनियां उजळल्या शुद्ध दिशा दाही ॥
हे माझे पाडसे सांवळे उठ कृष्णाबाई
सिद्ध सवें बळिराम घेउनि, गोधनें वना जाईं
मुनिजनमानसहंसा, श्रीमनःकमलभृंगा
मुरहर पंकजपाणी, पद्मनाभ श्रीरंगा
शकटांतक सर्वेशा, हे हरि प्रतापतुंगा ॥
कोटि रविंहुनी तेज आगळ तुझिया वदनाला
होनाजी बाळ नित्य ध्यातसे ह्रदयीं नाममाळा ॥ ४

++++++

# गणेश जनार्दन आगाशे.

[ १८५२-१९१९ ]

[हे शेवटपर्यंत सरकारी नोकर होते. ह्यांनीं आपली नोकरी संभाळून लहान स्फुट प्रकरणें लिहून मराठी भाषेस बरीच मदत केली. यांची शोकगीतें बरींच सरस आहेत. त्यांतल्या त्यांत 'बिरुदावली' हें राव-बहादूर रानडयांवर लिहिलेलें खंडकाव्य फारच उत्तम साधलेलें आहे.]

## कै० महादेव गोविंद रानडे.

प्रचंड नगराज तो हिमगिरी असे लोळला !
अगाध अथवा पयोनिधि अशेष तो आटला !
दुभंग अथवा अहो ! धरणिगोल हा जाहला
अकांत असला कसा भरतभूतलीं पातला ॥ १

हळाळति कशामुळें जन लहान मोठे वदा
विलापरव एवढा परिसिला न कोणीं कदा
हताश जन सर्वही, कवण विघ्न हो पातलें ?
दिसे भरतभूमिही सकल आर्त शोकानलें ॥ २

"हिरा बहुत साजिरा रुचिर कोहिनूराहुनी
क्षणीं हरपला" असें वदति दीनसे होउनी
दुजे "गगनिं लोपला अतुलतेज तारा" असें
वदूनि असु ढाळिती, परि मिती तयाला नसे ॥ ३

पडे मसलतींत जें गहन पंडितां सांकडें
जया पुढति मांडितां उलगडा तयाचा पडे
रमेसह सरस्वती विसरुनी जुनें वांकडें
यदीय गृहिं नांदती ! परि न गर्व ज्याला चढे ॥ ४

परोपकृतिचें महाव्रत अखंड ज्या आवडे
निरुद्यमचि रोगियाप्रति कुपथ्यसें वावडें
पदोपदिं जयाविणें प्रगतिकाज सारें अडे
दिसे विबुधवृंद ज्याविण अनाथसें बापुडें ॥ ५

"स्वकीय कुलदीप हा हरपला !" अशी ओरडे
स्वदेशजननी खळे नच अजूनि तीचें रडें
यदीय मृति सर्वही स्वजनकार्यभागीं नडे
रमारमण तो असा कवण नेणती रानडे ॥ ६

गुणी बुधशिरोमणी जनपदाग्रणी धोरणी
स्वदेशहितकारणीं झिजवि देह रात्रंदिनीं
सुहृद्व्यसनवारणीं श्रम गणी न विद्यार्जनीं
हिरा जडित कोंदणीं विलसला तसा सज्जनीं ॥ ७

जया उपजतां दिली अतुल ईश्वरें तीक्ष्ण धी
जयें श्रमुनि जोडिला अतिअगाध विद्यानिधी
जयाविण सरस्वतीसदन शून्यसें जाहलें
यदीय निधनीं नसे कवण भाग्य हो लोपलें ॥ ८

तुम्हीं भरतखंड हें निज कुटुंबसें लेखिलें
हिताहित पित्यापरी सतत आमुचें देखिलें
शिरीं सतत वाहिलें स्वजनकार्यचिंताभरा
प्रनष्ट जनछत्र हें म्हणुनि जीव हा घाबरा ॥ ९

दिनान्तसमयीं तुम्ही सहल अन्यमित्रांसवें
करूं निघतसां, मला सकल आज तें आठवे
सुबोध तुमचा तदा गमलि मेजवानीच ते
रसायनचि मानसा सुखवि पोषि चिच्छक्तितें ॥ १०

कड्यावरुनि कोसळे खळखळे जशी पर्वतीं
प्रशांत मृदुशाद्वलीं झुळुझुळू झरी सैकतीं
तशी विषयधोरणें चटुल वाग्नदी वाहिली
निमालि परि मर्मरश्रवणरूप ती राहिली ! ॥ ११

कठोर शठनास्तिकांविषयिं बोलतां ती गिरा
हिमालयगिरींतुनी घसरते जशी घोगरा
प्रसादयुत सज्जनाविषयिं बोलतां शांत ती
प्रयागपुर सोडितां स्थिर गभीर भागीरथी ॥ १२

जनस्थिति सुधारणाविषय वर्णितां कोमळ
नदी प्रभवनिर्गता रव करी जसा मंजुळ
परेशमहिमा तया प्रिय निरूपितां प्रेमळ
अगाधजलसिंधुचा प्रवह ज्यापरी निर्मळ ॥ १३

परोपकृतिच्या कृती तुमचिया स्मरूं मी किती
अनेकविध उद्यमा तुमचियाच त्या वर्णिती
शतांश तुमचा जरी इतर मानवां साधता
तरी खचित तो जनीं बहुत पावता धन्यता. १४

++++++

ग्रंथ संग्रहालय
ठाणे

# नारायण वामन टिळक.

[ १८६५–१९१९ ]

[ हे नवीन कवितेचे पुरस्कर्ते होत. ह्यांनीं स्फुट कविता लिहिली आहे. शिवाय, सुशीला, वनवासी फूल, बापाचे अश्रू वगैरे ह्यांचीं खंडकाव्यें प्रसिद्ध आहेत. टिळकांच्या काव्याचा मुख्य गुण प्रसाद होय. भावशुद्ध अंतःकरणानें आपल्या प्रभूशीं केलेले त्यांचे आलाप 'अभंगांजली' या नांवानें प्रसिद्ध आहेत. त्यांनीं आपणास दास असें उपपद घेऊन देवाला आळविलें आहे. इतकी सफाईची, साधी, हृदयस्पर्शी, मधुर व प्रसन्न अशी कविता कोणत्याही आधुनिक कवीची नाहीं. घेतलेले वेंचे अभंगांजलींतील आहेत.]

१

प्रसंग मोठाले येतील जातील । चिंतनीयां फळ काय त्याचें
थोडकें होतांना मनाच्या विरुद्ध । जीवा होशी क्रुद्ध याचें काय
थोडकें ऐकतां अप्रिय वचन । जीवा होसि खिन्न याचें काय
थोडकेसे श्रम होतां संसाराशी । कंटाळून जाशी याचें काय
पदोपदीं जीवा थोडक्यावरून । तुझा अपमान याचें काय
थोडकें चुकला क्षमा त्या करावी । नाहीं तुझ्या गांवीं याचें काय
थोडकें म्हणशी परी ही सांखळी । जड तुज झाली याचें काय
थोडक्यानें तूझें होतसे पतन । तरी तूं अजाण याचें काय
दास म्हणे जीवा थोडकेंच खोटें । यानें मोठमोठे नागविले

२

पाहिलें तिघांहीं पांखरूं सुरेख । तिघांना हरीख सारखाच
अंतराळाचिया अगा अलंकारा । अगा सर्वसारा वनश्रीच्या

म्हणे एक पुढें शब्द सूचतीना । आपण आपणा विसरला
दूसरा म्हणे मी हृदयीं भरून । जाईन घेऊन घरीं याला
रंगवीन ह्याचें आलेख्य सुंदर । आणील शंभर रुपये तें
तीसरा हळूच सोडि तीक्ष्ण तीर । पडे भूमीवर पांखरूं तें
उचली शवातें चाटि जीभल्यातें । वमती क्रूरते तोंड डोळे
दास म्हणे स्वर्ग पृथिवी नरक । पाहिजे तें एक येथें आहे.

३

नाहीं ठेवियेलें मजला तिष्ठत । सारें वस्तुजात मौन्य सोडी
वृक्षवल्लरींची करपल्लवी ही । नव नवलाई सांगे तूझी
बोलतां येईना नयो नाहीं चिंता । कधींच संकेता उणें नाहीं
गुलगूल गोष्टी पांखरें करीती । सर्व समजती तुला त्यांना
उगाच मी नाहीं डोलत हांसत । मज अवगत भाषा यांची
तृणांचे तरंग लहरीनर्तन । वाणी ती याहून काय करी
तुझीया कीर्तनीं रंगले निर्झर । श्रवणीं डोंगर रंगलेले
दास म्हणे देवा जाईन मी जेथें । उपासक तेथें तेथें तुझे.

४

सांग सांग पुष्पा कांरे हांसतस । हंसावें मूढास प्राज्ञें तेंवीं
मधुर हा गंध मधुर हें रूप । मधुर निष्पाप वृत्ती तूझी
बघून थोडासा रंगलों वर्णनीं। वर्णन अस्थानीं झालें का हें
विचारलें ऐसें फूलल्या फुलाला । म्हणे तें मजला नम्र भावें
क्षमा करा ठावें मज माझें दैन्य । कसें मी हंसेन कोणालाही
सनातन शुद्ध माधुर्यें तुषार । एक मजवर सोडीयेला
त्यांत काय झालें माझें मोठेपण । मजला म्हणून स्तवी जें तें
कळेना मजला समजती जन । मज लाजवून लाभ काय
माझीया दैवाचें कधीं कधीं मज । हंसूं ये सहज काय करूं
दास म्हणे लोकीं माजला देव्हारा । असाच हा सारा जेथें तेथें.

५

फुलें हांसती बोलती । पक्षिराज गाणीं गाती ॥
नित्य नवी रम्य प्राची । खाण सर्व सौंदर्याची ॥
तूंहि माझ्या अंतर्यामीं । तुझ्या आवडीच्या धामीं
प्रवर्तीशी उषःकाल । सर्व सौख्यांचा सुकाळ
जीव माझा मग्न झाला । तूझ्या चिंतनीं रंगला
दास म्हणे उजाडलें । खरोखरीं उजाडलें.

६

कांहिं मागायचें नाहीं । सांगायाचें नाहीं कांहीं
कशाला मी आलों येथें । माझें मला कळेना तें
मला देऊं दे हुंदके । आधिं येतील तीतुके
उगा तुझ्या पायांकडे । मला पाहूं दे गा कोडें
मला हंसूं दे हंसूं दे । मुखा येई तें बोलूं दे
मग आला तैसा जातों । पुन्हां सेवेला लागतों
दास म्हणे वेडें पोर । कृपा तूझी परी थोर

७

देऊळ अंतरीं तुझ घरींदारीं । शेजारीं बाजारीं राजद्वारीं
भेटतील भाई भेटतील ताई । देऊळें भव्य हीं बापा तूझीं
कृतींत मतींत सर्व प्रतीतींत । देऊळ नितांत रम्य तूझें
सर्व लाभालाभ सर्व जयाजय । तूंझ देवालय सुखें दुःखें
आठवत नाहीं पुढें आठवेल । सुंदर देऊळ तेंही तूझें
दास म्हणे बापा एकदां दीसलें । तेंच दिसलेलें राहो आतां.

८

नकोच तें कां रे लावीशी पाठीशीं । सांग अर्थ मशीं याचा आधीं
कां रे याला त्याला मज ओढूं देशी । व्रेधा उडवीशी कां रे माझी

कोंबूनी कोटरीं ठेवायाचें होतें । तरी कां पंखांतें वाढूं दीलें
आपुल्याच हस्तें फोडीं हे नयन । बसूं हे झांकून कोठवरी
सदा पुढें पुढें जीव ओढा घेई । अवजड पायीं बीडी परी
कधीं रे मजला सोडवीशी देवा । सोसवेना जीवा त्रास आतां
दास म्हणे बापा माझी कुरकूर । एकदांची दूर करीनास

९

निजीव मजला तुझ्या अंकावर । अंगावर कर ठेव माझ्या
तुझ्या मुखाकडे दृष्टि लागलेली । राहो खीळलेली मायबापा
असाच मजला दयाळा आनंदें । जीव हा सोडूं दे अंतीं आतां
दास म्हणे माझा छंद शेवटला । पुरीव वत्सला एवढा हा.

+++++

मराठी ग्रंथ संग्रहालय
नं.

# कृष्णाजी केशव दामले.

[ १८६५–१९०५ ]

## केशवसुत

[ यांची विविध विषयांवरील स्फुट कविता बरीच प्रसिद्ध आहे. ह्यांना नव्या कवितेचे म्हणजे इंग्रजी वळणाच्या कवितेचे मुख्य प्रवर्तक म्हणण्यास मुळींच हरकत नाहीं. ह्यांची भाषा जरी जराशी ओबडधोबड असली तरी ती क्लिष्टता उत्पन्न करीत नाहीं व ओजोगुणास पोषकच होते. देशांतील दुःसह स्थिति पाहून हे व विनायक जनार्दन करंदीकर सारखेच खिन्न होतात; पण केशवसुतांच्या कवितांत उमाळ्यांचा आवेग व भावनांचा आवेश फार. सुमारें १५० स्फुट कविता त्यांनीं लिहिल्या आहेत. ]

### पुष्पाप्रत !

[ अंजनीगीत .]

पुष्पा सुंदर किति तूं दिससी
सौकुमार्य माधुर्यहि धरिसी
तुजला बघतां मन माझें तूं–वेडें रे करिसी १

तूं आणिक मी पूर्वीं होतों
खेळगडी रे ! स्मरुनि अहा ! तो
काळ सुखाचा आतां–चित्ता खेद फार देतो ! २

मुग्ध मधुरता चित्तीं घेतां
पूर्वीं अपुली होती समता
गेला गेला काळ अहह तो ! फेर किती आतां ! ३

सौकुमार्य तव अजुनी आहे
हंसतचि आहे हास्य तुझें हें
परि मम भाळीं ढग अश्रूंचा—हाय डवरलाहे ! ४

तुजला पाहुनि मीं नाचावें
दुडदुड धांवत तुजशी यावें
प्रेमें तुजला स्वकरीं घेउनि—सखया चुंबावें ! ५

आतांहि गमे ध्यावें तुजला
परी सुटतसे कंप कराला !—
दिव्यत्वाला स्पर्श कराया—भय वाटे मजला ! ६

रम्य धुक्याची अद्भुत सृष्टि
तींत उघडिसी अपुली दृष्टि
मग तो भास्वान् तुजवरि करितो तेजाची वृष्टि ! ७

मरुद्गण तुझ्या पाळणियाला
तत्पर आंदोलन द्यायाला,
पक्षिमुखांहीं स्वर्ग तुझ्यावरि—गाई गीताला ! ८

रम्य तुझें बा जिणें कितीतरि
परिमलयश तव जाय भूवरी
कालहि तुझिया दिव्यत्वाला—वाटे नमन करी ! ९

चिरतरुणा रे ! चिररुचिरा रे !
तुज सांनिध तो वास बरा रे !
तुजमजमध्यें परी केवढी—आहे रुंद दरा रे ! १०

काळोखाच्या जगामध्यें या
मृत आशांच्या चितांवरुनि या
पिशाच माझें भटकत आहे,—शांति नसेचि तया ! ११

मच्चित्ताच्या क्षितिजावरतीं
नृत्याला जीं स्वप्नें करिती
निदान ! त्यांच्यामध्यें मजला-भासो तव मूर्ति ! १२

[ श्लोक. ]

सौभाग्य पुष्पा तव गावयाला
मी पात्र नाहीं गमतें मनाला
भृंगे तुझें स्तोत्र सुरेख गाती
ऐकूनि तें सर्व पळोत खंती. १३

---

## आम्ही कोण ?

[ शार्दूलविक्रीडित. ]

आम्ही कोण म्हणून काय पुससी ? आम्ही असूं लाडके
देवाचे, दिधलें तयें जग असे आम्हांस खेळावया
विश्वीं या प्रतिभाबलें विचरतों चोंहींकडे लीलया
दिक्कालांतुनि आरपार अमुची दृष्टी पहाया शके !
सारेही बडिवार येथिल पहा आम्हांपुढें ते फिके
पाणिस्पर्शच आमुचा शकतसे वस्तूंप्रति द्यावया
सौंदर्यातिशया, अशी वसतसे जादू करांमाजि या
फोलें पाखडितां तुम्ही, निवडितों तें सत्त्व आम्ही निकें.
शून्यामाजि वसाहती वसविल्या कोणीं सुरांच्या बरें ?
पृथ्वीला सुरलोकसाम्य झटती आणावया कोण ते ?
ते आम्हीच सुधा कृतीमधुनियां ज्यांच्या सदा पाझरे
ते आम्हीच शरण्य, मंगल तुम्हां ज्यांपासुनी लाधतें
आम्हांला वगळा गतप्रभ झणीं होतील तारांगणें !
आम्हांला वगळा विकेल कवडीमोलावरी हें जिणें !

++++++

मराठी ग्रंथ संग्रहालय
नं.
ता.

# विनायक जनार्दन करंदीकर.

[ १८७२–१९०९ ]

[ह्यांची भाषा संस्कृतप्रचुर नाहीं. हे साध्या भाषेंत आपल्या भावनांचा उत्तम परिपोष करितात. ह्यांची विरोधाच्या हत्यारानें वाचकाच्या मनांत भावनांची खळबळ उडवून देण्याची हातोटी प्रशंसनीय आहे. ह्यांचीं वीरत्नें, जोहार, हतभागिनी वगैरे इतर सुप्रसिद्ध कविता आहेत.]

## कृष्णाकुमारी.

[ चाल–चंद्रकांत राज्याची कन्या. ]

कळी–उमलली जों न पावली पूर्ण विकासाला
अदय कराचा तोंच तिजवरी पडला कीं घाला.
सुनील गगनीं चमकूं लागे सुंदर इंदुकला.
तोंच तिचा निर्घृण राहूनें धरिला हाय ! गळा !
भीम नृपाला प्रियतर बाळा कृष्णा वेल्हाळा,
नडली, पडली बळी अकालीं, त्या योगें काळा
स्वार्थ संसृती, लोभपरायण जगताची रीती
उठे सुतेवर पिता हितास्तव विसरे नयनीती

२

उपवर झाली भीमकबाळी रूपवती कृष्णा
तत्प्राप्तीस्तव सहज लागली भूपवरां तृष्णा
जयपुरराजा म्हणे गुणवती व्हावी मज भाजा
जोधपूरचा भूप म्हणे तो भाग असे माझा !
शिंद्याच्या जोरावर चढला मारवाडवाला
वांछी व्हावी प्राप्त आपणा कृष्णेची माला

जयपुरची मागणी तयानें धाकें परतविली;
राजस्थानीं वैराग्नीची ज्वाला भडकविली;
कृष्णेसाठीं सज्ज जाहले खड्गाचे हात
घोर युद्ध माजलें वाहले रक्ताचे पाट !

३

अमीर नामा पठाण घातक, नीच, अविश्वासी
उदेपुराधिप मानासाठीं ये भीमापाशीं
वदे हितास्तव करा स्वदुहिता अर्पण मानातें
अपकारक होईल जोडिलें अन्याशीं नातें
अथवा खंडूनच हें टाका मूळ अनर्थाचें
कां कारण होता पाडाया बळी सहस्रांचे !
विचार पडला कसा पोटचा गोळा तोडावा !
चुकवावें वा काय उपायें शत्रूंच्या घावा
चालक, मंत्री अजित नृपाचा तोचि मार्ग दावी;
'समयींच' म्हणे 'ही अग्नीची ज्योत मालवावी !'
आप्त जवळचा दौलत त्यावर ये ती कामगिरी
कोसळून आकाश गमे त्या पडलें काय शिरीं !
'धिक्कार असो ! वदे 'जीविता तुमच्या धिक्कार
व्यर्थ जन्म घेऊन जाहलां धरणीला भार
छत्र शिरीं मिरवितां ! म्हणवितां स्वतां लोकपाळ
पोर एक पोटची तिचाहि न करवे सांभाळ !
हाच काय पुरुषार्थ ! कुळाचा हाच काय मान !
पुरुष सजावा कीं अबलेची कापाया मान !
रजपूतांचे छावे आम्ही अबलांचे साथी,
वागवितों तलवार कटीला नित्य तयांसाठीं !

वदा कोण त्या मृणालिनीच्या जीवावर उठला?
तद्रक्ताचा तिच्या कपाळीं लाविन खास टिळा
पडेल जेथें मृगनयनेचा अश्रुबिंदु एक,
अरिरुधिरानें त्या स्थानावर लिहूं सूड-लेख
नको बुद्धि ती, नका, अमंगल वच तें उच्चारूं
धीर न सोडा; धर्म आपुला रणीं मरूं--मारूं."

४

बोध खलास न रुचे अहिमुखीं दुग्ध होय गरल
श्वानपुच्छ नलिकेंत घातलें होईना सरल !
दौलत थिजला; परि न खलांचा दुष्ट यत्न विझला
जवान दुसरा ती नव कलिका तोडाया सजला !
करूनियां निर्धार मनाचा, धरून तलवार,
गेला कृष्णेजवळ नीच तो करावया वार !
करीत होती हार फुलांचा जाईच्या रमणी
जणों करी स्वकरें तरुणांचीं हृदयें बद्ध गुणीं
हिमधवलांगी धवलचंद्रिकाहृदया बाला ती
धवल फुलें तीं धवल करानें धवल गुणीं गाठीं
कृष्ण हृदय धवलतेजवळ तें झालें धवल पळीं
नवल न धवलच बिंब शशीचें विलसे नील जळीं !
तिच्या दिव्य तेजानें दिपला, भरला कंप करीं
उगारलेलें शस्त्र तयाचें गळलें भूमिवरी !
टिकलें पुण्यप्रभावापुढें नाहीं पळ दुरित
भग्नमनोरथ परत दुरात्मा गेला थरथरत

५

गळून पडलें शस्त्र पुढें तें निशाण मरणाचें
धरून जें स्वकरीं भूमिवरी स्वैर मरण नाचे !

परि नाहीं ती धैर्यदेवता तिळभर डगमगली
मधु स्मिताचीं खळीं कपोलीं उलट तिच्या पडलीं !
परि मातेनें तिच्या मांडिला एकच आकांत
मातृहृदय तें करील कैसा सहन सुताघात !
पिटी उरःस्थल, कुंतल तोडी, कर माथां हाणी,
धाय मोकलुनि रडे, धरेला अश्रूंनीं न्हाणी.

६

पाषाणालाही शोकानें त्या पाझर फुटता,
परि न तयानें वळले खळ ते, त्यजी न विष कटुता !
शस्त्र न चाले म्हणुनि विषानें भरलेली वाटी
आणून दिली जनकाज्ञेनें कृष्णेच्या हातीं !
मिस्तवदनानें करीं विषाचा धरून तो प्याला
पदरें नयन पुशी मातेचे वदे वीरबाला:—
"कां करिसी हा शोक ? आणिसी कां नयनीं पाणी
कवण वांचला सांग, भूवरी आजवरी प्राणी !
मृत्यु सखा सोयरा जिवाचा असे सदा साथी !
मृत्युबलानें तुटे भवाची दुःखाची गांठी !
वाट जिवाला चिरसौख्याची मृत्यु मात्र दावी
वद, मग आली मरणाची कां संधि घालवावी ?
जन्म जयानें दिला तोच या जीवाचा स्वामी
भाग्यवंत ती, पडे संकटीं जनकाच्या कामीं !
धिग् जीवित ! ज्याकरितां पडती बळी असंख्यांचे
मरण यशाचें, जर त्यायोगें देशधर्म वांचे"

७

देऊन असा धीर, विषाचा घेई ती घोंट
मोहमूढ मातेस नावरे अश्रूंचा लोट !

एकदोनदां घोट विषाचा नाहीं तिज पचला
दुष्टांनीं यास्तव नाशाचा बेत नवा रचिला !
हाय ! कुसुंबा प्याया धरिला पुढें तिच्या ओठीं
मालविली यापरी खलांनीं ती रत्नज्योती
केला, अनुमोदिला जयांनीं कृष्णेचा अंत
त्यां शासाया चुकला नाहीं न्यायी भगवंत !
जसें करावें, तसें भरावें बीज तसे दाणे !
'विनायका'ला बोध करी हा कृष्णेचें गाणें

+·++·+

# राम गणेश गडकरी.

[ १८८५-१९१९ ]

## गोविंदाग्रज.

[हे गृहस्थ कवि, नाटककार व विनोदी टीकाकार म्हणून महाराष्ट्रभर विश्रुत आहेत. यांना महाराष्ट्राचा व तेथील लोकोत्तर विभूतींचा फार अभिमान वाटे. तोच महाराष्ट्रगीतांत व्यक्त झाला आहे. त्यांच्या इतर कवितांतून, लेखांतून व नाटकांतून वीर, हास्य व करुण ह्या रसांचा परिपोष चांगलाच केलेला आढळतो.]

### श्रीमहाराष्ट्रगीत!

मंगल देशा ! पवित्र देशा ! महाराष्ट्रदेशा
प्रणाम घ्यावा, माझा हा श्रीमहाराष्ट्रदेशा ॥ ध्रु०॥
राकट देशा, कणखर देशा, दगडांच्या देशा !
नाजुक देशा, कोमल देशा, फुलांच्याहि देशा ॥
अंजनकांचनकरवंदीच्या कांटेरी देशा
बकुलफुलांच्या प्राजक्तीच्या दळदारी देशा ॥
भावभक्तिच्या देशा, आणिक बुद्धीच्या देशा
शाहीरांच्या देशा, कर्त्या मर्दांच्या देशा ॥
ध्येय जें तुझ्या अंतरीं
निशाणावरी । नाचतें करीं
व्यवहारा परमार्थासी । वैभवासी वैराग्यासी
जरिपटक्यासह भगव्या झेंडयाच्या एकचि देशा
प्रणाम घ्यावा माझा हा श्रीमहाराष्ट्रदेशा १

अपर सिंधुच्या भव्य बांधवा ! महाराष्ट्रदेशा
सह्याद्रीच्या सख्या ! जिवलगा ! महाराष्ट्रदेशा ।
पाषाणाच्या देहीं वरिसी तूं हिरव्या वेषा
गोदा कृष्णा भीमा तुझिया ललाटिंच्या रेषा ॥
तुझिया देहीं करी प्रतिष्ठा प्रथम प्राणांची
मंगल वसती जनस्थानिंची श्रीरघुनाथाची ॥
ध्येय जें .... .... ....

भिन्न वृत्तिचीं भिन्न भिन्न हीं एकजीव सत्त्वें
तुझिया देहीं प्रकट दाविती दिव्य जीवतत्त्वें
चित्पावन बुद्धिनें करिसी तूं कर्तबगारी
देशस्थाच्या खुल्या दिलाची तुजला दिलदारी
कायस्थाचें इमान फिरवी रक्ताचा फेर
ठोक मराठी मनगट दावी तुझें हाडपेर
ध्येय जें .... .... ....

ठायीं ठायीं पांडवलेणीं सह्याद्रीपोटीं
किल्ले सत्तावीस बांधिले सह्याद्रीपाठीं
तोरणगडचा, प्रतापगडचा, पन्हाळगडिंचाही
लढवय्या झुंजार डोंगरीं तूंच सख्या पाहीं
सिंधुदुर्ग, हा विजयदुर्ग हा, ही अंजनवेल
दर्यावर्दी मर्दुमकीची ग्वाही सांगेल
ध्येय जें .... .... .... ४

तुझ्या भुकेला वरी, नागली आणि कणी कोंडा
वहाण पायीं, अंगीं कांबळी, उशाखालिं धोंडा
विळा कोयता धरी दिगंबर दख्खनचा हात
इकडे कर्णाटक हांसतसे तिकडे गुजरात

ग्रंथालय 2369 क्र. २

आणि मराठी भाला घेई दख्खन कंगाल
तिकडे इस्तंबूल थरारे तिकडे बंगाल
ध्येय .... .... .... ५
रायगडावर माय जिवाची गवळण बिनधोक
झोंक हिरकणी नांव ठेवुनी जाय रोखठोक
करीत पावन अर्पुनि पंचप्राणांचा पिंड
हिरडस मावळचा श्रीबाजी ती पावनखिंड
करी रायगढ रायरिचा तो जिजाइचा तान्हा
कोंडाण्याचा करी सिंहगड मालुसरा तान्हा
ध्येय .... .... .... ६
मयूर कविच्या पूर्णयमकमय महाराष्ट्रदेशा
कवि कृष्णाच्या निर्यमका हे महाराष्ट्र देशा
देवी ज्ञानेश्वरी करि जिथें भक्तीचा मळ
तिथेंच गीतारहस्य बसवी बुद्धीचा खेळ
जिथें रंगलीं साधीं भोळीं जनाइचीं गाणीं
तिथेंच खेळे श्रीपादांची कलावती वाणी
ध्येय .... .... .... ७
विकावयाला अमोल असली अभंगमय वाणी
करी तुझी बाजारपेठ तो देहूचा वाणी
तुला जागवी ऐन पहांटे गवळी गोपाळ
धार दुधाची काढित काढित होनाजी बाळ
मर्दांनी इष्काचा प्याला तुझा भरायासी
उभा ठाकला सगनभाउ हा शाहुनगरवासी ८

++++++

# त्र्यंबक बालकृष्ण ठोमरे.

[ १८९०–१९१८ ]

## बालकवि.

[ हे फार लहानपणापासून कविता लिहूं लागले. यांना जळगांव येथें भरलेल्या कविसंमेलनांत अध्यक्ष असलेल्या रा. ब. कीर्तीकरांनीं बालकवि ही पदवी दिली. श्रीयुत ठोमरे यांना सूर्योदय, सूर्यास्त, चंद्रप्रकाश, तारका, नदी, सृष्टिसौंदर्य इत्यादिकांची आवड फार. ती त्यांच्या कवितेंत जागोजाग प्रतिबिंबित झाली आहे. त्यांच्या कवितेंत नादमाधुर्य आहे. हें निर्झरांत बरेंच प्रत्ययास येतें.]

## निर्झरास !

गिरिशिखेंर वनमालाही । दरी दरी घुमवित येई
कड्यावरुनि घेऊनि उड्या । खेळ लतावलयीं फुगड्या
घे लोळण खडकावरतीं । फिर गरगर अंगाभंवतीं
जा हळुहळु वळसे घेत । लपतछपत हिरवाळींत
पाचूचीं हिरवीं रानें । झुलव गडे, झुळझुळु गानें
वसंत मंडप वनराई । आंब्याची पुढती येई
श्रमलासी खेळुनि खेळ । नीज सुखें क्षणभर बाळ
हीं पुढचीं पिकलीं शेतें । सळसळती गाती गीतें
झोंप कोठुनी तुला तरी । नाच लाडक्या नाच करीं
चाल, झरा तूं बाळ गुणी । बाल्याचि रे भरिसी भुवनीं

२

बालतरू हे चोंहिकडे । ताल तुला देतात गडे
प्रेमभरें त्यावर तूंही । मुक्तामणि उधळुनि देई

बुद्‌बुदलहरी फुलवेली । फुलव सारख्या भंवतालीं
सौंदर्यें हृदयामधलीं । दे विश्वीं उधळून खुलीं
गर्द सावल्या सुखदायी । वेलींची फुगडी होई
इवलालीं गवतावरतीं । रानफुलें डुलती हंसती
झुलवित अपुले तुरे तुरे । निळी नव्हाळी दाट भरे
जादूनेंच तुझ्या बा रे । वन नंदन बनलें सारें
सौंदर्याचा दिव्य झरा । बालवसंतचि तूं चतुरा
या लहरीलहरीमधुनी । स्फूर्ति दिव्य भरिसी विपिनीं

३

आकाशामधुनी जाती । मेघांच्या सुंदर पंक्ती
इंद्र धनूची कमान ती । ती संध्या खुलते वरतीं
रम्य तारका लुकलुकती । नीलारुणफलकावरतीं
शुभ्र चंद्रिका नाच करी । स्वर्गधरेवर एक परी
हीं दिव्यें येती तुजला । रात्रंदिन भेटायाला
वेधुनि त्यांच्या तेजानें । विसरुनियां अवघीं भानें
धुंद हृदय तव परोपरी । मग उसळवि लहरी लहरी
त्या लहरीमधुनी झरती । दिव्य तुझ्या संगीततति
नवल न त्यां प्राशायाला । स्वर्गहि जर भूवर आला
गंधर्वा ! तव गायन रे । वेड लाविना कुणा बरें

४

पर्वत हा ही दरीदरी । तवगीतें भरलीं सारीं
गाण्यानें भरलीं रानें । वर खालीं गाणें गाणें
गीतमय स्थिरचर झालें । गीतमय ब्रह्मांड डुले
व्यक्त तसें अव्यक्तहि तें । तव गीतें डुलतें झुलतें
मुरलीच्या काढित ताना । वृंदावनिं खेळे कान्हा

धुंद करूनि तो नाद गुणें। जगताही हंसवी गानें
दिव्य तयांच्या वेणुपरी। तूंहि निर्झरा नवल परी
गाउनियां झुळझुळ गान। विश्वाचें हरिसी भान
गोपि तुझ्या हिरव्या वेली। रास खेळती भंवतालीं
तुझ्या वेणुचा सूर तरी। चराचरावर राज्य करी
काव्यदेविचा प्राण खरा। तूंच निर्झरा कवीश्वरा
या दिव्यांच्या धुंदिगुणें। दिव्याला गासी गाणें
मी कवितेचा दास भला। कवी बोलती जगांतला
परि न झरे माझ्या गानीं। दिव्यांचीं असलीं श्रेणी
जडतेला खिळुनी राही। हृदयबंध उकलत नाहीं
दिव्यरसीं विरणें जीव। जीवित हें याचें नांव
तें जीवित न मिळें मातें। मग कुठुनी असलीं गीतें
दिव्यांची सुंदर माला। ओंवाळी अक्षय तुजला
तूंच खरा कविराज गुणी। सरस्वतीचा कंठमणी
अक्षय तव गायन वाहे। अक्षयांत नांदत रोह

*    *    *

शिकवीं रे शिकवीं मातें। दिव्य तुझीं असलीं गीतें
फुलवेली लहरी असल्या। मम हृदयीं उसळोत खुल्या
वृत्तिलता ठायीं ठायीं। विकसूं दे सौंदर्याही
प्रेमझरी काव्यस्फूर्ती। ती आत्मज्योती चित्तीं
प्रकटवुनी चवदा भुवनीं। दिव्य तिचें पसरीं पाणी
अद्वैताचें राज्य गडे। अविच्छिन्न मग चोहिंकडे
प्रेमशांतिसौंदर्यांही। वेडावुनि वसुधामाई
मम हृदयां गाइल गाणीं। रम्य तुझ्या झुळझुळ
आणि जसें सगळें रान। गातें तव मंजुळ गान
तेंवि सृष्टिची सतार ही। गाइल मम गाणीं कांहीं

# मराठी काव्यमंजूषा

इंग्रजी तिसरीपासून सहावीपर्यंत
उपयोगीं पडणारें पद्यपुस्तक.

**लवकरच**

**छापून तयार होईल.**

वा. गो. मायदेव.

# टीपा.

## ज्ञानदेव—

राजयाचिया—दुर्योधनाच्या (अभिप्रेत). २ सेनापती—येथें भीष्म. ३ तुलगासवें—प्रतिध्वनीबरोबर. ४ थावें—बळानें. ५ आस्फुरिलीं—वाजिवलीं. ६ तुरें-वाद्यें. ७ बंबाळ—ध्वनि. ८ जावळीचे—बरोबरीचे. ९ रहंवर—रथश्रेष्ठ. १० मीनले—मिळाले. ११ ब्रह्मकटाह—ब्रह्मांड १२ शतकूट—शेंकडों तुकडे.

निःसीमभावउल्हासें—अतिशय प्रेमानंदानें. २ आवडे—वाटे. ३ भंलतयांचें—वाटेल त्याचें ४ वोडवी—पुढें करी. ५ लेखें—समज. ६ तुरंबानें—हुंगावें. ७ साजुक—ताजें ८ आरोगूं—खाऊं. ९ नव्हेल कीं—नसेल ना. १० राउळें—राजवाडे, मंदिरें. ११ सेजारें—शय्यास्थानें. १२ बोनीं—पक्वान्नें. १३ वोगरिलीं—वाढलीं.

## तुकाराम—

मोहरी—पांवा. २ काहाळा—झांजा. ३ वोसंडल्या—सांडलें. ४ अमूप—( मोप )—पुष्कळ. ५ लेखा—गणति. ६ कुंभिपाक—एका नरकाचें नांव. ७ शिराणी—आवड, हौस ८ पांग—न्यूनताबुद्धि ९ निराळीं—मोकळीं. १० जुंझार—लढवय्ये ११ आलें साचभावें वर्ताया—आलों शब्द नको. १२ मारग—मार्ग.

## रामदास—

मौन्य—मौन. २ नये असा जरी पाठ असला तरी पांचव्या ओंवीच्या उत्तरार्धांत तो न ये असा तोडून लिहिल्यास अर्थ बरा लागतो. भ्रष्ट लोकांत जाणून बुजून बसलात तर मिथ्या दोष टाळतां येणार नाहीं. ३ चटक लावून—नाद, वेध लावून, आपल्या अभावीं त्यास चुकल्यासारखें व्हावें असें.

यमुनातटाक हें दासांनीं प्रामाणिका वृत्तांत लिहिलें आहे. हें समवृत्त असून त्याच्या प्रत्येक अक्षरांत आठ अक्षरें असतात. जरलग अशी गणांची रचना. यती चौथ्या व आठव्या अक्षरावर. रातले—रत झाले. २ उफाळती—उसळी घेत. ३ कंदंब—कळंब. ४ पळु पळे—पळ काढीत होता अगर प्रतिक्षणीं वहात होता. ५ थीर—स्थिर. ६ (कुजती—कूजती पाहिजे)—गात. ७ उलाट—उफाट, बागडणारे, ८ झपा—उडंपा. ९ त्रिभंग—मस्तक, शरीराचा मध्यभाग व पाय हेच तीन भाग

तीन लटांप्रमाणें दिसून अतिशय प्रमाणबद्ध होते. आनंदतनयाचें ध्रुववर्णन 'पहा'-सुकुमार आकर्ण पद्म नेत्र। ठाणमाण रेखिलें जेंवि चित्र. १० वेधु-छंद ११ व्रजांगना-गोपी. १२ गुणागळ्या-गुणांनीं श्रेष्ठ. १३ करी-समर्थांच्या अनेक नांवांपैकीं एक नांव.

## वामन—

विप्र-येथें भृगु अभिप्रेत. २ करिं कमंडलु यांत बुटबैंगण वामनाचें वर्णन बहारीचें साधलें आहे. ३ अपूर्व-अनादि, विलक्षण ४ सारे-साजे. ५ शवें-मृतें. निरर्थक शब्दयोजना झाली आहे. ६ उगा-पुनरुक्ति दोष झाला आहे. ७ पापा जाशिल-पाप लागेल. ८ झणीं-कदाचित्-नाहीं तर अध्याहृत. ९ विचारूनि-विचार करून. १० निगमविधिविधानें-वेदोक्त कर्ममार्गानें. ११ अब्जभव-ब्रह्मदेव. १२ दानव अरि-वामन. १२ पंचविसाव्या श्लोकांत प्रतिभेचें विशालत्व दिसतें.

## मुक्तेश्वर—

व्यजन-पंखा. २ आर्ती-तीव्र इच्छा. ३ इडेंपाडें-ईर्षेनें. ४ बागडीं-सोंगें ५ सहदेव-पुत्रास. ६ निरोपी-सांगे. ७ करटी-हत्ती. ८ अति उद्भट-अतिशय शूर. ९ वीरगुंठी-केशबंध. १० सूटला-ठेवला. ११ करकराट-करकरा. हुमणी-तडाखा. १२ तवकें-आवेशानें. १३ इसाळें-पिशाचें. १४ उधडिला-उखळला. १५ देहुडीं-वांकडीं.

## मोरोपंत—

कुजाता-निंद्य जन्म ज्याचें. २ वारणावती-हस्तिनापूर. ३ कितवातें-कपटातें-४ अलंकारे-अलंकृत झाला नव्हता. ५ घननाद-इंद्रजित्. ६ तुझ्या शकुनीला आम्हींच मारिलें-पुन्हां शकुनि खिळा लाव कीं. ७ गदाशक्तिदृष्टिचा शोण कोण-गदारूप देवीच्या आरक्त दृष्टीचा. ८ कोण-कोंपरा, कटाक्ष. ९ सुनासीर-इंद्र. १० सीर-शीर. ११ प्रतिकृत-प्रतिकार. तदेक-त्यांपैकीं एक. १२ पूर्वा... ओघांचा-पूर्वपश्चिम समुद्रांच्या ओघांचा. १३ बळसा-बळासुरासारखा. पोतें-शिशु अथवा नौकाविशेष. १४ विप्रताप-महापराक्रमी. १५ सरस्वती-ही नदी रक्तवर्णा आहे. १६ स्व...कौतुकां-ज्यांची स्वतःचीच आहे तुळा-तुलना-ज्यांत असें गदायुद्धकौतुक ज्यांचें अशा त्यां ( भीमदुर्योधनांस ). १७ असारपा-असार पाळका. १८ तडा खातो-भंग पावतो. १९ सदयेक्षण-कृपादृष्टि. २० निसुर निश्चित.

यांत पंत ईश्वराला हांक मारीत आहे. परंतु तो हांकेसरसा येत नाहींसें पाहून परमेश्वर कां बरें आला नाहीं हें चिंतून त्याबद्दल अनेक संशय घेत आहे. १ गर्व पुन्हां—गरुडगर्वपरिहाराची कथा येथें अभिप्रेत आहे. २ असदर्क—खलदुःशासन-रूप सूर्य. ३ पुराणपुरुषा, वृद्ध, अनादि. ४ आर्जविला—आर्जविला असतां. ५ दोषांत—नाम व भगवंत ह्या दोषांत. ६ बद्धमूल—दृढ झालेलें. ७ विधिनें—देवळांत भेटण्याच्या तऱ्हेनें ( भेटा ). ८ बाहे—हात.

## डोनाजी बाळ—

कापडी—मणि, गंडे, तीर्थ वगैरे विकत जाणारे व तांबडें निशाण घेऊन हिंडणारे यात्रेकरू. २ अघमर्षणादि—पापनाशक सूक्त वगैरे. ३ कुक्षीं—कडेवर (कुशीवर) ४ रंगावळि—रांगोळ्या. ५ अनंदकंदा—आनंदनिधाना. ६ स्मार्त—स्मृतिधर्मानुयायी. ७ निरंजनीं—परमात्म्याचे ठिकाणीं. पंच पंच उषःकालीं—सूर्योदयापूर्वीच्या पांच पवित्र घटका ( अगोदर ), ९ रविचक्र—रवि ज्या राशींत उगवतो ती रास.

## आगाशे—

अकांत—आकांत—कवितेंत आनें प्रारंभ असलेले शब्द विकल्पानें ऱ्हस्व. २ मृति—मरण. ३ रसायन—औषध. मर्मर—विशेष आवाज.

## टिळक—

हरीख—हर्ष. २ प्रवर्तीषी—सुरू करवितोस.

## दापले—

डवरणें—भरून येणें, लोंबणें. २ दरा—दरी. ३ शरण्य—रक्षण करण्यांत समर्थ.

## करंदीकर—

मृणालिनी—कमलिनी. २ कुसुंबा—अफूपासून केलेलें काळ विष.

## गडकरी—

कायस्थ—प्रभु. २ ग्वाही—साक्ष. ३ नागली—नाचणीसारखें तांबूस धान्य. ४ इस्तंबूल—कॉन्स्टॉंटिनोपल. ५ हिरकणी—गवळणीचें नांव. ६ हिडरस मावळ्याचें नांव. ७ रायरी गांवाचें नांव. ८ मयूर वगैरे.

याांत अनुक्रमें, मोरोपंत, केशवसुत, ज्ञानेश्वर, टिळक, जनाबाई, श्रीपाद कृष्ण कोल्हटकर, तुकाराम, होनाजीबाळ व सगनभाऊ या कवींचा कौतुकपूर्ण बोध आहे.

**ठोमरे—**

फलक-फळा. २ झरती-स्रवती. ३ चवदा भुवनें-भूरादि सप्तलोक व सात पाताळें.

---

REFBK-0002361
REFBK-0002361
दा. क्र. 2349